सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १७२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. २ ऑगस्ट २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## पाकिस्तान अस्वस्थ, पण वेदना मात्र काँग्रेस आणि समाजवादी पक्षाला

### ऑपरेशन सिंदूरचा उल्लेख करत पंतप्रधान नरेंद्र मोदींची टीका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२काशी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वाराणसीतील एका कार्यक्रमात पाकिस्तानवर संताप व्यक्त केला. यावेळी त्यांनी ऑपरेशन सिंदूरचा उल्लेख केला आहे आणि बदला घेण्याचे त्यांचे वचन पूर्ण केल्याचे म्हटले आहे. पंतप्रधानांनी यावेळी यावर भर दिला की, ऑपरेशन सिंदूर पूर्णपणे यशस्वी झाले आहे, पहलगामचे गुन्हेगार देखील मारले गेले आहेत. याचबरोबर त्यांनी पाकिस्तानसह काँग्रेस आणि समाजवादी पक्षावरही टीका केली.

पाकिस्तान, काँग्रेस आणि समाजवादी पक्षावर टीका करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, पाकिस्तान अस्वस्थ आहे, हे सर्वांनाच माहिती आहे. पण काँग्रेस आणि समाजवादी पक्ष पाकिस्तानच्या वेदना सहन करू शकत नाहीत. तिकडे पाकिस्तान रडत आहे आणि इथे काँग्रेस व समाजवादी पक्ष दहशतवाद्यांची अवस्था पाहून रडत आहेत. काँग्रेस सतत आपल्या सैन्याच्या शौर्याचा अपमान करत आहे. काँग्रेसने ऑपरेशन सिंदूरला 'तमाशा' म्हटले आहे.



समाजवादी पक्षावर टीका करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, वोटबँक आणि तुष्टीकरणाच्या या राजकारणात समाजवादी पक्षही मागे नाही. त्यांचे नेते प्रश्न विचारत होते की, या विशिष्ट दिवशीच पहलगाम दहशतवादी का मारले गेले? कोणतीही कारवाई करण्यापूर्वी मी त्यांना फोन करून विचारायचे का? सामान्य ज्ञान असलेल्या कोणालाही उत्तर देता येईल की, दहशतवाद्यांना मारण्यासाठी आपण वाट पाहण्याची गरज आहे का? आपण त्यांना पळून जाण्याची संधी दिली पाहिजे होती का? हे तेच लोक आहेत, जे सत्तेत असताना दहशतवाद्यांना क्लीन चिट देत असत आणि आता दहशतवादी मारले गेल्यावर ते नाराज होत आहेत. त्यांना 'सिंदूर' या ऑपरेशनच्या नावाची समस्या आहे.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज मी ऑपरेशन सिंदूर नंतर पहिल्यांदाच काशीला आलो आहे. जेव्हा २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला झाला होता, तेव्हा २६ निष्पाप लोक इतक्या क्रूरपणे मारले गेले होते. माझे हृदय वेदनेने भरले होते. तेव्हा मी बाबा विश्वनाथांना प्रार्थना करत होतो की, त्यांनी सर्व पीडित कुटुंबांना हे दुःख सहन करण्याची हिंमत द्यावी. माझ्या मुलींच्या सिंदूरचा बदला घेण्याचे मी जे वचन दिले होते ते देखील पूर्ण झाले आहे. हे केवळ महादेवाच्या आशीर्वादाने शक्य झाले आहे.

## ...तर तुम्हालाही अटक होईल; राज ठाकरेंनी दिलेल्या आव्हानावर मुख्यमंत्री फडणवीस स्पष्टच बोलले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२नागपूर**

महाराष्ट्र विधानसभेने नुकताच जनसुरक्षा कायदा मंजूर केला आहे. काही दुरुस्त्या आणि बदल होऊन विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात हा कायदा मंजूर करण्यात आला. विरोधकांनी या कायद्याला विरोध सुरुच ठेवला आहे. दुसरीकडे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही या कायद्यावरुन बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आव्हान दिलं. आम्हाला फक्त अटक करून दाखवा असं राज ठाकरे यांनी म्हटलं. त्यावर प्रत्युत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्बन नक्षलसारखे वागाल, तर तुम्हालाही अटक होईल, असं म्हटलं.



शेतकरी कामगार पक्षाच्या ७८ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरेंनी रायगडमध्ये हजेरी लावली होती. यावेळी भाषणामध्ये राज ठाकरेंनी जनसुरक्षा कायद्यावरुन सरकारवर निशाणा साधला. आम्हाला अर्बन नक्षल म्हणणाऱ्यांनी आधी स्वतःची पात्रता तपासावी. आम्हाला फक्त अटक करून दाखवा, असं आव्हान राज ठाकरेंनी सरकारला दिलं. त्यावर नागपुरात माध्यमांशी बोलताना अशा प्रकारची वक्तवे ही कायदा न वाचता केलेली आहेत अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री फडणवीसांनी दिली.


हा कायदा त्यांच्याकरता बनलेला नाही. तुम्ही अर्बन नक्षलसारखे वागाल तर तुमची अटक होईल. तुम्ही अर्बन नक्षलसारखे वागत नाहीत त्यामुळे तुमची अटक करायचं कारण नाही. जे लोक कायद्याच्या विरोधात वागतात त्यांच्यासाठी हा कायदा आहे. आंदोलकांच्या विरोधात हा कायदा नाही. सरकारच्या विरोधात बोलायची पूर्ण मुभा आहे. त्यासाठी हा कायदा नाही. अशा प्रकारची वक्तव्यं ही कायदा न वाचता केलेली आहेत, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.महाराष्ट्राचा मुख्यमंत्री हिंदीसाठी आग्रही असल्याचेही राज ठाकरे म्हणाले. त्यावरही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य केलं. माझं अतिशय पक्क मत आहे की महाराष्ट्रामध्ये मराठी शिकली पाहिजे, ती अनिवार्य असली पाहिजे. पण महाराष्ट्रातल्या मराठी मुलांना मराठीत सोबत अजून एक भारतीय भाषा शिकायला मिळाली तर त्यात काय वावगं आहे.

## जागे राहा, सतर्क राहा, महाराष्ट्र विकला जाऊ देऊ नका; मनसे प्रमुख राज ठाकरेंचं जनतेला आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२ पनवेल**

विकत घेता येणारी माणसे अशी प्रतिमा आपली महाराष्ट्राबाहेर उभी करण्यात येत आहे. मराठी माणसं विकाऊ आहे असं सांगितले जाते त्याची लाज वाटते. महाराष्ट्रात आपण आपली भाषा विसरतोय, आपली तत्वे घालवतोय, जमिनी घालवतोय. स्वाभिमानी माणसे विकली गेली तर जिवंत प्रेते उरतात. देशाला दिशा देणारा हा महाराष्ट्र आहे. तुम्ही मोठे झाले पाहिजे, पण महाराष्ट्र विकून नाही. इतरांच्या आहारी जाऊन जमिनी देऊन टाकायच्या, बाहेरची माणसे येतायेत. जागे राहा, सतर्क राहा, महाराष्ट्र विकला जाऊ देऊ नका अशी कळकळीचं आवाहन मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी जनतेला केले आहे. शेतकरी कामगार पक्षाच्या ७८ व्या वर्धापन दिनी राज ठाकरे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.

राज ठाकरे म्हणाले की, शेकापच्या व्यासपीठावर मी दुसऱ्यांदा येतोय. पक्षाचा विचार न करता मराठीचा मुद्दा समजून घेतला पाहिजे. जेव्हा जेव्हा चांगले रस्ते आले आहेत तेव्हा राज्य सरकारचे लक्ष नसेल तर तो प्रदेश बर्बाद व्हायला वेळ लागत नाही. महाराष्ट्र राज्याचा मुख्यमंत्री महाराष्ट्रात लहान मुलांना हिंदी कशी आणता येईल, शिकवता येईल याचा विचार करतोय. महाराष्ट्रात कामधंदा करायला जे येतायेत त्यांना मराठी कशी येईल याचा विचार करत नाही. महाराष्ट्रातला मराठी माणूस, भूमिपूत्र याचा विचारच राज्य सरकारला नाही. याचे भीषण



वास्तव रायगड जिल्ह्यात आहे. रायगडातील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी चालल्या आहेत. कुठे चालल्यात माहिती नाही. जमिनीचे व्यवहार करणारे आपलेच, कुंपनच शेत खातायेत. उद्योगधंदे इथे येतायेत आणि लोक बाहेरून आणले जातील. शेतकरी आणि कामगार दोन्ही उद्धवस्त होतोय. रायगड जिल्ह्याची जबाबदारी जयंत पाटील यांनी हाती घेतली पाहिजे. इथला मराठी माणूस, इथला शेतकरी, उद्योगधंदे यावर मराठी माणसाने लक्ष ठेवणे गरजेचे आहे असं त्यांनी सांगितले.

तसेच देशाचे पंतप्रधान, गृहमंत्री दोघेही गुजरातचे आहेत. अमित शाह स्वत: एका मुलाखतीत मी गुजराती आहे, हिंदी भाषिक नाही असं सांगतात. महाराष्ट्रातले अनेक प्रकल्प आज गुजरातला जातायेत. प्रत्येकाला आपल्या राज्याबद्दल प्रेम असते मग आम्ही संकुचित कसे? हिंदी गुजरातमध्ये सक्तीची नाही मग महाराष्ट्रात का? भाषा संपली आणि जमीन गेली की जगाच्या पाठीवर तुम्हाला कसलेही स्थान नाही. गुजरातमध्ये कायद्यानुसार जे गुजराती नाहीत, अधिवासी भारतीयांना थेट शेत जमीन विकत घेता येत नाही. ज्या राज्याचे पंतप्रधान, गृहमंत्री गुजरातचे आहेत, तिथली शेतजमीन भारतातील कुठलाही नागरीक विकत घेऊ शकत नाही. जर जमीन विकत घ्यायची असेल तर एक विशिष्ट कायदा आहे त्यानुसार परवानगी घ्यावी लागते. आज आपल्याकडे कुणीही जमीन विकत घेतंय. आमचेच लोक जमिनी विकतायेत. यातून आपणच संपणार हे आपल्या लोकांच्या लक्षात येत नाही अशी खंत राज ठाकरे यांनी व्यक्त केली.

आता सरकारने कायदा आणला आहे जो आंदोलन करेल तो अर्बन नक्षल...एखाद्या प्रकल्पाला तुम्ही विरोध केला तर सरकार तुम्हाला अटक करू शकते. अटक करूनच पाहा, मराठी माणसाच्या थडग्यावर उद्योग उभे राहू देणार नाही. उद्योग आणायचे असतील तर मराठी माणसांना त्यात सामावून घ्यावे लागेल असं सांगत राज ठाकरे यांनी जनसुरक्षा कायद्यावर टीकास्त्र सोडले.

## ग्रॅन्डमास्टर दिव्या देशमुखला शासनाकडून ३ कोटींचे बक्षीस

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२नागपूर**

नागपूरकर असलेल्या दिव्या देशमुखने फिडे महिला बुद्धीबळ विश्वचषकाचा अंतिम सामना जिंकून विश्वचषक आपल्या नावावर केला आहे. दिव्याचा शनिवारी नागपुरातील सुरेश भट सभागृहात शासनातर्फे सत्कार आयोजित करण्यात आला होता. यावेळी दिव्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ३ कोटी रुपयांच्या बक्षीसाचे धनादेश देऊन गौरवण्यात आले. यापूर्वीही तिला १ कोटी रुपयांचे बक्षीस दिले गेले होते. त्यावर देवेंद्र फडणवीस यांनी महत्वाचे भाष्य केले आहे.

नागपुरातील सुरेश भट सभागृहात शनिवारी महाराष्ट्र शासनातर्फे ग्रॅन्डमास्टर दिव्या देशमुख हिचा विश्वविजेती




झाल्याबद्दल नागरी सत्कार आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी मंचावर क्रीडामंत्री मानिकराव कोकाटे, ड. आशिष जयस्वाल, महाराष्ट्र बुद्धीबळ संघटनेचे अध्यक्ष परिणय फुके, ग्रन्डमास्टर दिव्या देशमुख यांच्यासह आमदार व मोठे अधिकारी उपस्थित होते. देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, आता खेळाला सर्वत्र व्यवसायिक रुप येत आहे.

महाराष्ट्र शासन क्रीडा क्षेत्राला महत्व देत असल्याने देश पातळीवरील स्पर्धेत महाराष्ट्राचा क्रमांक आता वरचाच राहतो. शासनाकडून आता खेळाडूंना चांगले फिजिओथेरपीस्ट, न्यूट्रेशियनिस्ट, देशी- विदेशी प्रशिक्षकांसह इतरही सोय देण्याचे प्रयत्न आहे. पूर्वी आंतराष्ट्रीय स्पर्धेत खेळायला जाणाऱ्या खेळाडूंसोबत प्रशिक्षकालाही जायची परवानगी नव्हती. तेथे खेळाडू महत्वाचा असतोच. परंतु त्याच्यासोबत प्रसिक्षकासह इतरही सोयी महत्वाच्या असतात. इतर देशातील खेळाडूकडे या सगळ्या सोयी राहत असल्याने आपल्या खेळाडूला अडचणी यायच्या. त्यामुळे शासनाने सर्व नियम बदलले. सोबत शासनाने खेळाडूंना आता मोठ्या प्रमाणावर रोख बक्षीसही देणे सुरू केले.

## एक आठवडा आधीच अमरनाथ यात्रा बंद

### मुसळधार पावसामुळे बालटाल व पहलगाम दोन्ही मार्ग खराब, यावर्षी ४.१ लाख भाविकांनी दर्शन घेतले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२श्रीनगर**

अमरनाथ यात्रा थांबवण्यात आली आहे. ही यात्रा ९ ऑगस्टपर्यंत सुरू राहणार होती, परंतु मुसळधार पावसामुळे रस्त्यांची दुरवस्था झाल्यामुळे ३ ऑगस्ट रोजीच ती थांबवण्यात आली.

काश्मीरचे विभागीय आयुक्त विजय कुमार बिधुरी म्हणाले की, पावसामुळे यात्रा मार्गांचे बरेच नुकसान झाले आहे. बालटाल आणि पहलगाम दोन्ही मार्गांवर दुरुस्तीचे काम केले जाईल, त्यामुळे यात्रा थांबवावी लागली आहे. मार्गांवर सतत मशीन आणि कर्मचारी तैनात असल्याने



यात्रा पुन्हा सुरू करणे शक्य नाही, असे त्यांनी सांगितले.अमरनाथ यात्रा ३ जुलै रोजी सुरू झाली आणि ९ ऑगस्ट रोजी रक्षाबंधनाच्या दिवशी संपणार होती. यावर्षी आतापर्यंत ४.१० लाख भाविकांनी अमरनाथ गुहेला भेट दिली आहे, तर गेल्या वर्षी ५.१० लाखांहून अधिक भाविक आले होते.

**२०२४ मध्ये ५ लाख प्रवासी आले**

२०२४ मध्ये ही यात्रा ५२ दिवसांची होती. २०२३ मध्ये ही यात्रा ६२ दिवस, २०२२ मध्ये ४३ दिवस आणि २०१९ मध्ये ४६ दिवस चालली. २०२०-२१ मध्ये कोरोना साथीमुळे यात्रा पुढे ढकलण्यात आली. २०२४ मध्ये ५२ दिवसांच्या अमरनाथ यात्रेत ५ लाखांहून अधिक भाविकांनी पवित्र गुहेत बाबा बर्फानी यांचे दर्शन घेतले.२०२३ मध्ये ४.५ लाख यात्रेकरूंनी सहभाग घेतला होता. २०१२ मध्ये विक्रमी ६.३५ यात्रेकरूंनी दर्शन घेतले. २०२२ मध्ये कोविडमुळे हा आकडा कमी झाला आणि ३ लाख यात्रेकरू दर्शनासाठी आले.

## सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणात पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२परभणी**

परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी यांच्या न्यायालयीन कोठडीत झालेल्या मृत्यू प्रकरणी अखेर पोलिसांत खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सर्वोच्च न्यायालयाने (डउ) दिलेल्या आदेशानुसार हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोमनाथच्या आई विजयाबाई सूर्यवंशी यांनी संभाजीनगर उच्च न्यायालयात या प्रकरणी याचिका दाखल केली होती. त्यावर एका आठवड्यात मृत्यूचे संबंधित पोलिसांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश न्यायालयाने दिले होते. त्यावर राज्य शासनाने सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली



होती. ३० जुलै रोजी म्हणजेच दोन दिवसांपूर्वी सर्वोच्च न्यायालयाने यावर निकाल देत गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. त्याच आदेशान्वये परभणीच्या नवा मोंढा पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्ती विरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे आता यावर वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा प्रकाश आंबेडकर आणि सोमनाथचे कुटुंब काय भूमिका घेतात हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे या प्रकरणाचा तपास आता सीआयडीकडे (उखऊ) वर्ग करण्यात आला आहे. या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने जे आदेश दिलेत. त्या अनुषंगाने अगोदर या खुनाच्या प्रकरणात कोण पोलीस दोषी आहेत त्याची जबाबदारी निश्चित करून मग नावे या गुन्ह्यात समाविष्ट करावीत असेही निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.



## संपादकीय ......

# पत्ते पिसे, तो क्रीडामंत्री दिसे!

आपल्या लाडक्या देशात काही गोष्टी अशा असतात ज्या विज्ञानाच्या नव्हे, पण विचित्रपणाच्या नाटक, रहस्य, खलनायक, विनोद आणि थोडं डोकं फिरवणारं अशा सगळ्या चवींनी भरलेल्या असतात. यात नव्याने भर पडली ती माणिकराव कोकाटे यांच्या रूपाने. रमीच्या डावात ते पकडले गेले आणि लगेच क्रीडामंत्री झाले! यावरून स्पष्ट झाले की, महाराष्ट्रात 'गेम खेळला' की गेम बदलतो. यातून सरकारने जणू सांगितले, जो खेळत असतो, तोच योद्धा असतो. मग तो खेळ भले घराघरातल्या माणसांनी टाळलेला असो, कायद्याच्या धोक्यात येणारा असो किंवा त्याच्या आड काचेच्या ग्लासातून झळकणारा 'सामान्य शौक' असो. आता अनेकांना गहन प्रश्न पडला आहे की, माणिकराव कोकाटे यांनी त्यांच्या युवावस्थेत असा कोणता खेळ खेळला होता, जो बघून सरकारने आज त्यांच्या हातात क्रीडा व युवक कल्याण मंत्रालय दिले? खरेच कुतूहलाचे आहे. कारण ना कोणती मैदानी खेळातील कामगिरी, ना कुठलाही विद्यार्थीदशेतील क्रीडा नेतृत्वाचा दाखला.

मग हे खाते त्यांच्या पदरात नेमके कसे पडले? आता तुम्ही म्हणाल, एखाद्या व्यक्तीने जीवनात एकही वाक्य लिहिले नसले तरी त्याला साहित्य अकादमीचा पुरस्कार देण्यासारखं हे आहे. पण तुमचा हा तर्क चुकतोय. खरं तर कोकाटे यांना युवा अवस्थेपासूनच डाव कसा लावायचा, कुठल्या 'जोकर्स'ना जवळ ठेवायचं, कोणाला 'ड्रॉप' करायचं आणि योग्य क्षणी कोणता पत्ता 'शो' करायचा याचे योग्य ते प्रशिक्षण मिळालेले होते. त्यामुळे त्यांना हे मंत्रीपद यापूर्वी कधीच मिळायला हवे होते. त्यांच्या करिअरचा मागोवा घेतला तर लक्षात येते, की ते राजकारणात बराच काळ 'खेळत' होते. पण तो सत्तेच्या संगीत खुर्चीचा खेळ होता. त्यासाठी ते कधी काँग्रेसमध्ये, कधी भाजपमध्ये, कधी शिवसेनेत तर कधी शरद पवारांच्या राष्ट्रवादीतदेखील होते. अगदीच या पक्षांमध्ये राहूनही मंत्रीपद मिळत नाही, म्हटल्यावर त्यांनी लोकसभा निवडणुकीत अपक्ष म्हणूनही स्वत:ला आजमावून बघितले.

इतके सारे पक्ष बदलल्यानंतर ते आता अजित पवारांच्या राष्ट्रवादीत स्थिरावले आणि सगळेच खेळ करत ते आता क्रीडा मंत्रीपदापर्यंत पोहोचले. राजकारणाच्या खेळात इतके मोठे योगदान देणार्या एखाद्या नेत्याला जर क्रीडामंत्रीपद बहाल केले तर इतरांना पोटदुखी का व्हावी? खरंच, कोकाटे साहेबांच्या 'खेळण्याच्या' कौशल्याला सलाम! मैदानाविना खेळून मंत्रालय मिळवण्याच्या या उंच उडीच्या खेळाला कदाचित इतिहासात 'राजकीय रमीचा बादशहा' म्हणून नोंदविले जाईल. त्यातून समाजाचा प्रगल्भ वर्ग अचंबित होऊ शकतो. शाळांमधील खेळांचे शिक्षक, जे वर्षानुवर्षे विद्यार्थ्यांमध्ये मैदानी कौशल्य विकसित करण्यासाठी झगडत आले, त्यांना प्रश्न पडू शकतो की, 'आम्ही रमी खेळायला शिकवलं असतं तर विद्यार्थी मंत्री झाले असते का?'

असो, आता कोकाटे साहेबांनी 'रमी'मध्ये विशेष प्राविण्य मिळवले, म्हणून थेट क्रीडामंत्री झाले! उद्या कोणी दारू पिताना पकडला, तर त्याला 'उत्पादन शुल्क मंत्री' बनवले गेल्यास नवल वाटू नये. कोणी मटका लावताना पकडला गेला, तर त्याला अर्थखाते दिले जाईल. कारण मटकाही 'रिस्क मॅनेजमेंट'चाच भाग आहे! यापुढे जर कोणी दिवसभर फेसबुकवर 'फ्रेंड रिक्वेस्ट' पाठवत असेल, तर त्याला थेट सामाजिक न्यायमंत्री करावे!

कारण समाजाशी इतका व्यापक संवाद कोण साधतो? तीनपत्ती खेळणार्यांना थेट मंत्रिमंडळातील धोरण नियोजन विभाग द्यायला हवा. संजय गायकवाडांसारख्या 'भल्या माणसाने' कॅन्टीनमध्ये डावीकडून हुक मारला.. उजवीकडून अपर कट दिला तर बिघडलं कुठे? खरं तर ही थेट ऑलिम्पिकच्या लेव्हलची कामगिरी झाली! त्यांना बॉक्सिंग महासंघ, स्पोर्ट्स अथॉरिटी आणि गरज पडलीच तर शारीरिक शिक्षण अभ्यास मंडळाचे अध्यक्षपदही बहाल करता येईल.

राजकीय निकषांच्या या स्पर्धेतून गृहराज्यमंत्री योगेश कदमांना कसे वगळता येईल? कायद्याची पर्वा न करता, पोलीस खाते, प्रशासन आणि सर्वोच्च न्यायालयाची छाती मोडून जर डान्स बार सुरू ठेवायचं धैर्य कोणीतरी दाखवत असेल, तर त्याला अशा धाडसी खात्याच्या मंत्रीपदावर ठेवणं सरकारचं परम कर्तव्यच आहे. हा निव्वळ योगायोग कसा म्हणावा? संसदेच्या पवित्र सभागृहात विरोधक जेव्हा 'तमाशा' हा शब्द उच्चारतात, तेव्हा पंतप्रधानांसह त्यांच्या पक्षातील नेते, प्रवक्ते, समर्थक यांना अपार वेदना होतात. शब्दाच्या पवित्रतेचं गंडांतर सुरू होते. तमाशा हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचा भाग आहे, लोककलेचा जिवंत वारसा आहे आणि त्याला संसदेत वापरणं म्हणजे अपमान वगैरे. ठीक. शब्दांची व्याख्या आणि त्यांचा वापर ही नीतिमत्तेची गोष्ट झाली. पण हीच नीतिमत्ता त्याक्षणी गायब होते, जेव्हा सत्ताधारी पक्षाचा मित्रपक्ष असलेला नेता कायद्याचं संपूर्ण उल्लंघन करून खर्याखुर्या डान्स बारचं संचालन करतो.

विशेष म्हणजे त्याला गृहराज्यमंत्रीपदाची गॅरंटी दिली जाते. हे म्हणजे वरच्या मजल्यावरून 'मर्यादा'चे श्लोक म्हणायचे आणि खाली तळघरात 'मर्यादे'चा खून करण्याचा प्रकार झाला. योगेश कदम यांचा डान्स बारबाबतचा वाद हा काही 'राजकीय विरोधकांची खाज' म्हणून फेटाळता येणार नाही. मुंबई पोलिसांनी त्यांच्या वरळीतील बारवर कारवाई केली, त्याबाबत न्यायालयात तक्रारी गेल्या. तरीही, त्या व्यक्तीकडून गृहखात्याची जबाबदारी काढून न घेणं या कृतीला काय म्हणावं? खरं तर, राजकीय नैतिकतेचा 'तमाशा' कधीच संपला आहे. आता सुरू आहे तो सत्तेच्या मंचावर चालणारा 'नाच'.. ज्यात सगळ्या सुरांचा एकच ठेका आहे, 'तुम्ही काहीही करा, फक्त आमच्या बाजूला राहा!'

# तडका : सर्व काही फ्री..!




विक्री करणार्या लोकांचे कौशल्य आपल्या देशात वाखाणण्यासारखे आहे. पावसाळा आला की मान्सून सेल लागतात. डिस्काऊंट २० टक्के, ३० टक्के, अगदी ५० टक्केपर्यंत दिला जातो. काही ठिकाणी दोन शर्ट घेतले तर पाच शर्ट फ्री अशीही ऑफर असते. एकावर एक फ्री किंवा एकावर तीन फ्री असे बोर्ड दिसले की, नकळत आपले लक्ष तिकडे जात असते. हीच व्यापार्यांच्या विक्री कौशल्याची खूण असते.

तुम्हाला असे वाटेल की, भारतीय लोकांना काहीही फ्रीमध्ये मिळण्याचे फार आकर्षण असते. त्यामुळे आपल्याकडे असे प्रकार होतात. असे अजिबात नाही, हे पहिल्यांदा ध्यानात घेतले पाहिजे. याच्यावर ते फ्री आणि त्याच्यावर हे फ्री हे परदेशात सर्रास असते आणि तीच लाट आता आपल्याकडे आली आहे. आज घराघरात वॉशिंग मशिन वापरले जाते. वॉशिंग मशिनचे जे लिक्विड असते ते घ्यायला तुम्ही गेलात तर त्याच्याबरोबर साबण किंवा इतर डिटर्जंट फ्री असतात. कशावर काहीही फ्री देऊन कोणीही नुकसानीत व्यवसाय करत नसते हे आधी समजून घेतले पाहिजे. दोनवर पाच शर्ट फ्री दिले तर त्या दोनची किंमत इतकी वाढवलेली असते की, व्यापार्यांना भरपूर नफा कमवता येतो. फ्री मिळाले म्हणून तुम्ही खूश आणि व्यापार झाला म्हणून ते खूश, असा काहीसा हा सगळा खुशी खुशीचा मामला आहे. सेलच्या पण जाहिराती स्वस्तात काही मिळते आहे याकडे तुमचे लक्ष आकर्षित करणे हा याचा उद्देश असतो. कुणी व्यापारी स्वतःच लिहितो की, व्यापारात नुकसान आल्यामुळे दुकान बंद करत आहे. त्यामुळे उरलेला सगळा माल अत्यंत कमी दरात विक्रीला काढलेला आहे. पटापट या आणि स्वस्तात कपडे घेऊन जा. अशा जाहिराती आपले लक्ष वेधून घेतात आणि नकळत आपली पावले या दुकानांकडे वळत असतात. मध्यंतरी एका आंघोळीचा साबण विक्रेत्या कंपनीने काही साबणांमध्ये सोन्याची नाणी ठेवली होती.

आमचा साबण वापरा आणि भाग्यवान लोकांनो सोन्याचे नाणे फ्रीमध्ये मिळवण्याची संधी प्राप्त करा, अशा जाहिराती करण्यात आल्या होत्या. नशिबाचे काही सांगता येत नाही. कुणाचे नशीब कधीही उघडू शकते या अपेक्षेने तुम्ही–आम्ही या साबणाच्या वड्या शेवटपर्यंत घासत वापरल्या. परंतु नाणे काही हाती लागले नाही. एवढ्या मोठ्या देशात करोडोंच्या संख्येने साबण विकले जात असतील तर कंपनीने किती साबणांमध्ये किती नाणी ठेवली होती याचा काही अंदाज आपल्याला येऊ शकत नाही. आपण आपले अंगभर घासून साबण लावत राहतो आणि नाण्याची वाट पाहात राहतो. साबण काही उरत नाही आणि नाणे काही सापडत नाही, अशी काहीशी परिस्थिती झाली होती.जे लोक मान्सून सेल लावतात, ते उन्हाळ्यात पण सेल लावतच असतात. बरेच लोक स्वस्तात मिळतात म्हणून कपडे सेलमध्येच खरेदी करतात. सेल लावलेला व्यापारी भरपूर नफा कमवतो आणि स्वस्तात मिळाले म्हणून ग्राहकही खूश असतो.

------

# मुलांचं वाढतं वजन पालकांच्या हातात? जाणून घ्या आहारतज्ज्ञांचा इशारा

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक**




आजच्या काळात लहान वयात स्थूलता ही एक गंभीर आरोग्य समस्या बनत चालली आहे. पूर्वी मध्यमवयीन किंवा वयस्क व्यक्तींमध्ये दिसणाऱ्या लठ्ठपणाचं प्रमाण आता लहानग्यांमध्ये झपाट्याने वाढत आहे.



आणि या वाढीमागे केवळ मुलांची चूक नसून, त्याला तितक्याच प्रमाणात जबाबदार असतात त्यांच्या घरातले पालक.

आहारतज्ज्ञ डॉ. प्रणिता अशोक यांनी स्पष्टपणे सांगितलं की, 'मुलांना काय खायचं ते ते ठरवत नाहीत, ते आपण पालक ठरवतो. मग त्यांचं आरोग्य बिघडलं, तर जबाबदारीसुद्धा आपलीच असते.'

त्या पुढे म्हणाल्या, 'पालकांनी त्यांच्या घरात टेबलवर जे ठेवायचं, त्याकडे विशेष लक्ष द्यायला हवं. जर तुम्ही टेबलावर बिस्किटं, चिप्स, मॅगी, शॉर्टकट पाकिटं ठेवत असाल, तर मुलं तेच पाहून, तेच खाणार. त्यांना माहिती नसतं की काय आरोग्यदायक आहे आणि काय नाही. ते फक्त पॅक पाहतात, चव पाहतात आणि लगेच हात लावतात.'

पालकांनी काय करावं?

१) डॉ. प्रणिता यांचा सल्ला

२) टेबलवर फळांची टोपली असू द्या.

३) मखाने भाजून ठेवा, जे पॉपकॉर्नपेक्षा जास्त पौष्टिक आहेत.

४) घरी बनवलेला मुरमुर्याचा चिवडा, पातळ पोह्यांचा चिवडा, तिखट-गोड भडंग ठेवा.

५) फरसाण आणि तळलेले पदार्थ टाळावेत.

६) मुलांबरोबर हेच पदार्थ खावेत, म्हणजे त्यांच्यातही तेच सवयीने येईल.

पॅरेंटिंग फक्त प्रेमाने होत नाही, शिस्तही गरजेची असते,' असंही त्या म्हणाल्या. मुलांच्या आहाराच्या सवयी लहानपणापासून घडतात. त्यामुळे जर सुरुवातीपासून पालक सजग राहिले, तर मुलांचं आरोग्य टिकून राहतं.

# बारा हजार एकरावर 'हुमणी'चे आक्रमण; एकरी २० हजाराचा दणका बसणार

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक**

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

हुमणी अळीचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढू लागल्याने ऊस, भुईमूग या पिकांचा रंगच बदलून पिके निस्तेज दिसू लागली आहेत.

**खोची:** हुमणी अळीचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढू लागल्याने ऊस, भुईमूग या पिकांचा रंगच बदलून पिके निस्तेज दिसू लागली आहेत. मुळावर आक्रमण करणारी ही अळी पिकांना लुळे बनविते आहे. यामुळे शेतकरी कमालीचा हैराण झाला आहे.

मार्गदर्शक व आधार असणारा कृषी विभाग मात्र अळीच्या प्रादुर्भावाबाबत अजूनही जागृत झालेला दिसत नाही. त्यामुळे हा विभाग कधी जागा होणार अशी विचारणा शेतकरी करू लागला आहे.

जिल्ह्यात सुमारे १२ हजार एकरवरील पिकावर हुमणी किडीने हल्ला केला असल्याचे समोर आले आहे. खरीप हंगामात शेतकऱ्यांनी कसेबसे सोयाबीन, भुईमूग, कडधान्ये यांची टोकन केली.

ऊस लागणीच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणात सरी सोडून आंतरपिके केली आहेत. त्यानंतर आडसाली लावणी सुरू झाल्या आहेत. आतापर्यंत जिल्ह्यात १२ हजार ३९० हेक्टरवर लागणी झाल्या आहे.

जिल्ह्यात २ लाख ८ हजार हेक्टर क्षेत्रात ऊस आहे. यातील जेथे माळरान आहे, पाणी साचण्याचे प्रमाण कमी आहे. अशा ठिकाणी असणाऱ्या उस, भुईमुगाच्या शेतात हुमणीने मुळ्या फस्त करण्याचा कार्यक्रम जोरात सुरू ठेवला आहे.

याची सुरुवातच लक्षात येण्यास उशीर होतो. त्यामुळे ऊस वाळून कोलमडू लागला अन् भुईमुगाची पाने पिवळी पडून सुकू लागतात. त्यानंतर हुमणी नियंत्रणासाठी कीटकनाशकचा वापर सुरू झाला आहे.

परंतु याचा वापर मुळांपर्यंत होत नसल्याने ही अळी शंभर टक्के नियंत्रणात येणे अवघड बनले आहे. त्यामुळे उसाचे १० ते १५ टक्के नुकसान होण्याचा अंदाज व्यक्त होत आहे. उसाचे एकरी ३० हजार तर भुईमुगाचे एकरी २० हजार रुपयांचे नुकसान होणार आहे.

गेल्या पंधरा वीस दिवसांपासून हुमणीची चर्चा शिवारात सुरू आहे. परंतु शेतीला उत्पन्नाच्या वाढीसाठी किडीच्या बंदोबस्तासाठी मार्गदर्शन करणारा कृषी विभाग मात्र अजूनही जागृत झाला नसल्याच्या तक्रारी आहेत.



हुमणी कशी बनते?

शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु नॅचरल्स
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

मादी अळी ५० ते ६० अंडी घालते.

अंडी रंगाने पांढरी असतात.

ही अंडी २ ते १२ दिवसांनी उबवतात.

अंड्यातून बाहेर पडणाऱ्या अळीला हुमणी म्हणतात.

काही दिवस ही अळी सेंद्रिय पदार्थांवर जगते, नंतर पिकांच्या मुळावर हल्ला करते. पिकांच्या मुळावरच त्यांची उपजीविका चालते.

**उपाय काय?**

ऊस शेतीत फीप्रोनील व इमीडाक्लोप्रिड तर भुईमुगासाठी कार्बोफ्युरॉन या रासायनिक कीटकनाशकाचा तर बिवेरिया व मेटारायजम या जैविक कीटकनाशकाचा वापर करून हुमणी नियंत्रण करावी.

खरिपात लावलेला भुईमूग फुल कळीला आला असून, अचानकच त्याची पाने पिवळी पडून वाढ खुंटली आहे. हुमणी लागल्याचे उशिरा लक्षात आले. त्यानंतर आळवणी करून नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. परंतु नुकसान होणार आहे.

**– सर्जेराव मोहिते, शेतकरी संभापूर**

हुमणी प्रादुर्भाव ऊस पिकावर मोठ्या प्रमाणात झाला आहे. नियंत्रणासाठी रासायनिक व जैविक कीटकनाशके वापरून शेतकरी नियंत्रण करू लागला आहे. मोठ्या पावसाची खूप गरज आहे. तसेच सोयाबीनवरही पाने कुरतडणारी अळी आली आहे.

**– सचिन पाटील, शेती मार्गदर्शक भादोले**

# खरीप पीकविमा अर्जासाठी १४ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक–** यंदाच्या खरीप हंगामातील पीकविम्यासाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत आता १४ ऑगस्टपर्यंत वाढवण्यात आली आहे. यासंदर्भातील अधिकृत पत्र शुक्रवारी (ता.एक) दुपारपर्यंत पोचलेले नव्हते, मात्र दुसरीकडे वेबसाइटवरून अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया राबवली जात होती. तसेच, त्याठिकाणी अंतिम तारीख १४ ऑगस्ट करण्यात आलेली आहे.या हंगामातील पीकविमा काढण्यासाठी यंदा अंतिम मुदत ३१ जुलै देण्यात आली होती. ही मुदत गुरुवारीच संपुष्टात आली.




दरम्यान, पीकविमा योजनेच्या पोर्टलवर १४ ऑगस्ट ही नवीन अंतिम तारीख दाखवली जात आहे. त्यानुसार सेवा सुविधा केंद्रचालकांनी शुक्रवारी सकाळपासूनच शेतकऱ्यांना आवाहन करणारे संदेश समाज माध्यमावर व्हायरल केले. शेतकऱ्यांनी त्वरित विमा काढावा असे त्यात आवाहन केले जात होते.पीकविमा मुदतवाढीच्या अनुषंगाने कृषी खात्यातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता त्यांनी तारीख वाढली असल्याचे मान्य केले. मात्र, त्याचे अधिकृत पत्र येण्याची प्रतीक्षा करीत असल्याचेही सांगितले. पीकविम्याच्या नव्या स्वरूपामुळे आणि अपुरा प्रतिसाद मिळाल्यामुळे ही मुदतवाढ देण्यात आल्याची चर्चा आहे.

विमा हप्त्याची रक्कम, पीक आणि प्रक्रियेतील गुंतागुंत यामुळे अनेक शेतकऱ्यांनी अद्यापपर्यंत विमा काढलेला नाही. आता वेबसाइटवर मुदतवाढ दिली गेलेली असली तरी स्पष्ट अधिकृत अधिसूचना नसल्याने यंत्रणांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली होती.

मात्र, मुदतवाढ झाल्याने वेबसाइटवर अर्ज स्वीकारण्याचे कामकाज व्यवस्थित सुरू होते. "आम्ही शेतकऱ्यांना विमा काढण्याचे सांगत आहोत. शेतकऱ्यांनी १४ ऑगस्टची संधी गमावू नये. सुविधा केंद्रांवर चौकशी करून, आवश्यक कागदपत्रांसह लवकरात लवकर विमा काढावा," असेही या सेवा सुविधा केंद्र चालकाने सांगितले.

# मनपा पथकाच्या कारवाई नंतर अतिक्रमण 'जैसे थे'च

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती** महापालिके च्या अतिक्रमण निर्मूलन विभागाद्वारे शहरातील रस्त्यांच्या कडेला तसेच फुटपाथवर असलेले अतिक्रमण काढण्याचा धडाका सुरू असला तरी शहरात अतिक्रमण कायमच आहे. हॉकर्सने काही ठिकाणे अशी ताब्यात घेऊन ठेवली आहेत की ते जागेवरून हलण्यास तयार नाहीत.महापालिकेचे पथक व पोलिस आल्यानंतर हॉकर्स परिसरातील गल्ली बोळांमध्ये पळतात. पथक व पोलिस परतले की पुन्हा रस्त्यावर येऊन अतिक्रमण करतात, अशीस्थिती आहे. सकाळ पासून रात्रीपर्यंत मनपाच्या अतिक्रमण विरोधातील कारवाया सुरू आहेत. ज्या परिसरात कारवाई होते तेथे अतिक्रमण निदान त्या दिवशी होत नाही. कारण, महापालिकेच्या पथकाकडून साहित्य जप्त केले जाते. परंतु, त्यानंतर दुसऱ्या दिवशी जैसे थे स्थिती दिसते. याबाबत मनपा आयुक्तांनी नुकतीच हॉकर्स झोन निश्चित करण्याबाबत महत्त्वाची बैठक घेतली. याबाबत कार्यवाही होण्यास काहीसा वेळ लागणार असल्याने तोपर्यंत हॉकर्सही त्यांचा व्यवसाय करून घेत आहेत.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / PDF / वेब – पोर्टल /ई – पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

शनिवार दि. २ ऑगस्ट २०२५

शहर/ग्रामिण


## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्य गुणगौरव पुरस्कार

# आदर्श शिक्षकांना मिळणार एक लाख रुपये

### शंभर १०० गुणांची पडताळणी, १०९ शिक्षकांना मिळणार पुरस्कार

**सुधीर केने**

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि२अमरावती –** शिक्षक हा समाजाचा सर्वांगीण विकासाचा पाया आहे .समर्पित वृत्तीने काम करणाऱ्या शिक्षकांमुळे समाज व राष्ट्राचा विकास होतो अशा समर्पित वृत्तीने काम करणाऱ्या शिक्षकांना दरवर्षी शालेय शिक्षण व क्रीडा विभागातर्फे राज्य आदर्श शिक्षक पुरस्काराणे गौरविले जाते. यावर्षी पहिल्यांदाच राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार मिळणाऱ्या शिक्षकांना एक लाख रुपये रोख रक्कम दिली जाणार आहे.दरवर्षी राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार घोषणा १५ ऑगस्ट रोजी केली जाते व पाच सप्टेंबर रोजी शिक्षक दिनी सर्व शिक्षकांना आदर्श पुरस्काराचे वितरण करण्यात येते. दरवर्षी आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांना दोन ज्यादा वेतन वाढ देण्यात येत होत्या .परंतु यावर्षी पहिल्यांदाच दोन ज्यादा वेतन वाढीऐवजी एक लाख रुपये ठोक रक्कम देण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे .




आदर्श शिक्षकांसाठी वीस मुद्द्यात शंभर गुणांची पडताळणी केली जाणार आहे .राज्यातील एकूण १०९ शिक्षकांना हा पुरस्कार दिला जातो .यामध्ये प्राथमिक ३८ ,माध्यमिक ३९ ,आदिवासी क्षेत्रात उत्कृष्ट काम करणारे प्राथमिक १९, आदर्श शिक्षिका ८, विशेष शिक्षक कला व क्रीडा २ ,दिव्यांग १ ,स्काऊट गाईड मध्ये २ शिक्षकांना हा पुरस्कार दिला जातो.या पुरस्कारासाठी नामांकन दाखल करत असताना शिक्षक किंवा मुख्याध्यापकाची एकूण सलग सेवा किमान दहा वर्ष असणे आवश्यक आहे. तसेच सबंधित शिक्षकाचे मागील पाच वर्षाचे गोपनीय अहवाल तपासले जाणार आहेत .विभागीय चौकशी सुरू नसल्याचे शिक्षण अधिकारी यांचे प्रमाणपत्र द्यावे लागणार आहेत. विशेष म्हणजे शिक्षकांनी केलेल्या लगतच्या पाच वर्षाच्या सेवा कालावधीतील कार्याचे मूल्यमापन राज्य व जिल्हास्तर समितीकडून गुणांकनाद्वारे करण्यात येणार आहे त्यासाठीच १०० गुण देण्यात आलेले आहेत.

#### नामांकन अल्प, तीन ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

राज्य आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी राज्यातील काही जिल्ह्यात अत्यल्प प्रतिसाद मिळाला आहे . या पुरस्कारासाठी कमी शिक्षकांनी नामांकन भरल्यामुळे तसेच काही कॅटेगिरी मध्येही शिक्षकांनी अत्यल्प प्रतिसाद दिल्याने अखेर ३ ऑगस्टपर्यंत राज्य आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी नामांकन भरण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. विशेष म्हणजे त्या त्या जिल्ह्यात शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी नामांकन भरण्यासाठी प्रवृत्त करावे असे आदेश वरिष्ठ स्तरावरून देण्यात आले आहे.

# अमरावती शासकीय रुग्णालयांत डॉक्टरांची ६२ टक्के पदे रिक्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती–** जिल्ह्याचा आरोग्याचा भार असलेल्या शासकीय रुग्णालयात रिक्त पदांचा गुंता कायम आहे. जिल्हा सामान्य रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, स्त्री रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय येथे क्लास वन डॉक्टरांची ५६ पदे मंजूर आहेत; प्रत्यक्षात केवळ २१ पदे भरली असून, ३५ पदे ही रिक्त आहेत. त्यामुळे तब्बल ६२ टक्के पदे रिक्त असून उर्वरित ३८ टक्के डॉक्टरांवरच जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयांचा भार आहे.जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयांत येणाऱ्या रुग्णांची संख्या ही मोठ्या प्रमाणावर आहे. आजही गोरगरीब रुग्णांसाठी शासकीय रुग्णालयच संजीवनी म्हणून काम करतात; परंतु येथे रिक्त पदांमुळे उर्वरित डॉक्टरांवर कामाचा ताण वाढला आहे. जिल्ह्यात जिल्हा रुग्णालय, एक जिल्हा स्त्री रुग्णालय सहा उपजिल्हा रुग्णालये आठ ग्रामीण रुग्णालये, चार ट्रॉमा केअर युनिट, तर एक महिला व बालरुग्णालय आहे. या ठिकाणी रोज हजारोंच्या संख्येने रुग्ण उपचारासाठी दाखल होत असतात. सर्वाधिक रुग्णांची गर्दी ही जिल्हा रुग्णालयात होते; परंतु अनेकवेळा डॉक्टर; तसेच इतर कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे रुग्णांना चांगलाच मनस्ताप सहन करावा लागतो. जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयात वर्ग एक ते चारपर्यंत एकूण १५६९ पदे मंजूर आहे. त्यातील ३३३ पदे हे रिक्त आहेत.

#### रुग्णांना उपचार मिळणार कसे?



#### सुपरच्या 'फेज टू'मध्ये ५० पदे रिक्त

विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल) येथील फेज टू इमारत मागील तीन वर्षांपासून कार्यान्वित झाली आहे. या ठिकाणी हृदयरोग, कर्करोग, तसेच मेंदू विकारावरील विविध शस्त्रक्रिया होत आहेत; परंतु येथे मंजूर असलेल्या ५२ क्लास वन अधिकाऱ्यांपैकी केवळ २ पदेच भरलेली असून, ५० पदे अजूनही रिक्त आहेत.

#### आरोग्यमंत्री लक्ष देणार का ?

आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर हे १५ ऑगस्टपूर्वी जिल्ह्याचा दौरा करणार असल्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी १९ जुलैला घेतलेल्या आरोग्य विभागाच्या आढावा बैठकीत सांगितले होते. त्यामुळे आरोग्य विभागातील या रिक्त पदांचा गुंता ते कसे सोडविणार? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

## उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी–कर्मचाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार, विभागीय आयुक्तालयात महसूल सप्ताहाचा उत्साहात शुभारंभ

# लोककल्याणकारी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी

### –विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि२अमरावती,** महसूल विभाग हा राज्य शासनाचा कणा म्हणून ओळखला जातो. समाजातील सर्व घटकांशी महसूल विभागाचा संबंध येतो. महसूल विभागाकडून पुरविण्यात येणाऱ्या विविध सेवा आणि राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटकाला मिळवून देण्यासाठी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. प्रत्येक अधिकारी–कर्मचाऱ्याने आपल्याला सोपविलेल्या कामाप्रती अत्यंत प्रामाणिक, नियमाधिन राहून सामान्यजनतेची कामे वेळेत पूर्ण होण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे. त्यातूनच तुम्हाला समाजसेवा केल्याचा आत्मीक आनंद प्राप्त होईल, असे प्रतिपादन विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी आज येथे केले. आरोग्यदायी जीवन जगण्यासाठी ध्यानसाधना व प्राणायम आदी फावल्यावेळेत करावे, असेही त्यांनी सांगितले. दि. १ ते ७ ऑगस्ट, महसूल सप्ताह निमित्त येथील विभागीय आयुक्त कार्यालयात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांचा गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. यावेळी अपर आयुक्त अजय लहाने, रामदास सिध्दभट्टी, सुरज वाघमारे, यवतमाळचे अपर जिल्हाधिकारी अनिल खंडागळे, नगरविकास सह आयुक्त नितीन कापडनीस आदी व्यासपीठावर उपस्थित होते. विभागीय आयुक्त डॉ. सिंघल म्हणाल्या की, शासनाबद्दल व शासनाच्या कामकाजासंदर्भात नागरिकांमध्ये विश्वास वृध्दींगत व्हावा, महसूल विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा नागरिकांना वेळेत लाभ मिळावा यासाठी विशेष मोहीम व लोकाभिमूख उपक्रम राबविण्याच्या हेतूने १ ऑगस्ट ते ७ ऑगस्टपर्यंत महसूल सप्ताहाचे विभागात सर्वत्र आयोजन करण्यात आले आहे. आजपासून म्हणजे १ ऑगस्ट या महसूल दिनी सप्ताहाचा शुभारंभ होत आहे. या सप्ताहात महसूल विभागाशी निगडीत जनसामान्यांची कामे पूर्ण केल्या जाईल. महसूल सप्ताहाच्या निमित्ताने महसूल विभागाकडून समाजाच्या विविध घटकांपर्यंत सेवा पोहोचवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी महसूल विभागातील प्रत्येक अधिकारी कर्मचाऱ्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे, असे त्यांनी सांगितले. महसूल दिनाच्या शुभारंभप्रसंगी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात येत आहे. ही संबधित अधिकारी कर्मचाऱ्यांनी केलेल्या कामाची पावती असे सांगून पुरस्कारार्थींचे त्यांनी अभिनंदन केले. यापुढेही ज्यांना आज पुरस्कार मिळाला नाही, त्यांनी याचे शल्य न बाळगता आपल्याला सोपविलेले कार्य, जबाबदारी आणखी जोमाने करुन दिलेले लक्षांक पूर्ण करावे. पुढच्यावर्षी मी सुध्दा पुरस्कार मिळविणारच, अशी मनोदय बाळगावा. ई– गव्हर्नन्स, ई ऑफीस तसेच नवीनतम तंत्रज्ञानाचा आपले कार्यालयीन कामकाज सोपे करण्यासाठी नियमितपणे वापर करावा, असे विभागीय आयुक्तांनी यावेळी सांगितले.




सप्ताहाच्या पुढील दिवसांमध्ये २०११ पूर्वीपासून शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून राहणाऱ्या पात्र कुटुंबांना पट्टे वाटप, पाणंद आणि शिवार रस्त्यांची मोजणी करून त्यांच्या दुतर्फा वृक्षलागवड, मंडळ स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाचे आयोजन, तसेच लाभार्थ्यांच्या घरी भेट देऊन डिबीटी प्रक्रिया पूर्ण करणे, हे महत्त्वाचे उपक्रम राबवले जाणार आहेत. तसेच, शासकीय जमिनीवरील अतिक्रमण हटवणे, शर्तभंग प्रकरणांबाबत निर्णय घेणे आणि शासनाच्या एम–सँड धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करून महसूल सप्ताहाची सांगता करण्यात येईल. राज्य शासनाने महसूल प्रशासनातील पारदर्शकता वाढवून जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी अशा प्रकारच्या उपक्रमांना प्राधान्य दिले आहे. यानुसार, विभागातील पाचही जिल्ह्यांत जिल्हाधिकारी कार्यालयाव्दारे प्रत्येक दिवशी ठराविक विषयांवर विशेष मोहिमा राबवण्यात येणार आहेत, असे विभागीय आयुक्तांनी यावेळी सांगितले.१ ऑगस्ट महसूल दिन साजरा करण्यामागचा मुळ उद्देश यासंदर्भात अपर आयुक् अजय लहाने यांनी प्रास्ताविक भाषणातून सविस्तर माहिती दिली.राज्याचे प्रमुख उत्पन्नाचे साधन हे शेतसारा होते. शेरशहा सुरी पासून तर ब्रिटीश व छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील चौथाई, संरजामी व सरदेशमुखी पध्दतीने शेतसाराची वसूली आदीबाबत अपर आयुक्त सुरज वाघमारे यांनी माहिती देऊन महसूल विभागाचे महत्व त्यांनी विशद केले.रामदास सिध्दभट्टी यांनी महसूल विभागात संचयन करण्यात येत असलेल्या माहितीचे पृथ्थकीकरण कसे करावे, याबाबत मार्गदर्शन केले. धोरणे तयार करणसाठी तसेच योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत माहितीचा उपयोग कसा होतो, याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. प्रशासनामध्ये महसूल कर्मचाऱ्याची महत्वाची भूमिका असून लोकांच्या समस्यांचे वेळेत निराकरण करण्यासाठी मानवतेचा स्पर्श बाळगावा, असे त्यांनी सांगितले. नवीनतम तंत्रज्ञानाचा उपयोग लोककल्याणसाठी करावा, असेही ते म्हणाले.यवतमाळचे अपर जिल्हाधिकारी अनिल खंडागळे यांनी लोकांना वेळेत आणि तत्परतेने महसूल विभागाच्या सेवा देण्यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग कसा करावा यासंबंधी मार्गदर्शन केले. ई–गव्हर्नन्स, ई ऑफीस, आपले सरकार पोर्टल, सेवाहक्क हमी कायदा आदी संदर्भा त्यांनी माहिती दिली.

यावेळी कार्यक्रमात भक्ती गीत गायन आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण झाले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन वैशाली दुधे यांनी केले.

**उत्कृष्ट कार्य करणारे पुरस्कारार्थी :** १ ऑगस्ट, महसूल दिना निमित्त अमरावती विभागातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांचा सन्मान चिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. तपशील पुढीलप्रमाणे –

**विभागीय स्तरावरील अधिकारी–** कर्मचाऱ्या मध्येयवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालयाचे अपर जिल्हाधिकारी अनिल खंडागळे, अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयाचे उप जिल्हाधिकारी विवेक जाधव, चिखलीचे तहसीलदार संतोष काकडे, मारेगावचे नायब तहसीलदार महेश रामगुंडे, अकोल्याचे लघुलेखक दिलीप ढोले, बुलढाण्याच्या सहा. महसूल अधिकारी पल्लवी राठोड, भातकुलीचे मंडळ अधिकारी गौरव सुरपाटणे, महसूल सहाय्यक रामानंद सरस्वती, उमरखेडचे ग्राम महसूल अधिकारी वैभव सुर्यवंशी, शिपाई श्रीमती चामट, शिपाई नंदा मडावी, वाहन चालक रोहन सरक, वसंत कौलकर, महसूल सेवक राम अडकणे, पोलीस पाटील चंद्रसेन नांदुरकर, सुजय देशमुख आदींचा समावेश आहे.

विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती येथील पुरस्कारार्थी :अपर आयुक्त रामदास सिध्दभट्टी, सह आयुक्त किरण पाणबुडे, सहायक आयुक्त वैशाली पाथरे, तहसिलदार शारंग ढोमसे, श्रीमती प्रज्ञा काकडे, स्विय सहायक अतुल बुटे, सहायक संचालक संतोष कंदेवार, नायब तहसिलदार मधुकर धुळे, संदीप टांक, निम्नश्रेणी लघुलेखक अतुल लवणकर, चंद्रकांत धकीते, सहा. महसूल अधिकारी संतोष अग्रवाल, श्रीमती वैशाली व्यवहारे, विजय सुर्यवंशी, महसूल सहाय्यक विष्णू अलोणे, वाहनचालक सुमित निचत, दिगांबर खांडगौरे, शिपाई संजय बोरे, श्रीमती शोभा प्रधान आदींचा समावेश आहे.

# बाजार समिती सभापती नरेंद्र पावडे यांना कारची धडक गंभीर जखमी अवस्थेत नागपूर ला हलविले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२वरुड –** वरूड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नरेंद्र पावडे व्यायाम करून घराकडे पायी परत येताना मागून येणाऱ्या कारची त्यांना जोरदार धडक बसली. यात ते गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारार्थ नागपूर येथे हलविण्यात आले आहे.

नरेंद्र पावडे हे ऑरेंज सिटी कॉन्व्हेन्ट येथे सुरु असलेल्या योगा क्लासमधून परत घराकडे पायी येत होते. दरम्यान मागून येणाऱ्या एका स्विफ्ट कारची त्यांना जोरदार धडक बसली. हा अपघात सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्य कैद झाला आहे. पावडे यांना उपचारासाठी नागपूर येथील रूग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच पंचायत समितीचे माजी सभापती विक्रम ठाकरे व एपीएमसीचेसंचालक राजीव गांधी व इतरांनी याप्रकरणात पोलिसात तक्रार दिली आहे. नरेंद्र पावडे हे एक स्पष्ट वक्ते असून ते नेहमीच शेतकऱ्यांवर होत असलेल्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवित आले आहेत. माजी आमदार नरेशचंद्र ठाकरे यांचे कट्टर समर्थक आहेत. यासंदर्भात पं.स.चे माजी सभापती विक्रम ठाकरे यांनीपोलिस तपासात काय निष्पन्न होईल त्याकडे आमचे लक्ष असल्याचे सांगितले. याघटनेबाबत अपघात की नियोजित कट असा तर्क लावला जात आहे



# युवा स्वाभिमान पार्टीचे निलेश भेंडे यांच्यावर प्राणघातक हल्ला

## आमदार राणा यांच्या घरासमोरील घटना, कार्यकर्त्यांमध्ये खळबळ

नीलेश भेंडे यांच्यावर आमदार राणा यांच्या घरासमोरील कॉम्प्लेक्समध्ये काही हल्लेखोरांनी चाकूने हल्ला चढविला. सद्यःस्थितीत हल्लेखोर पसार असून त्यांचा शोध सुरू आहे. लवकरच हल्लेखोर पोलिसांच्या ताब्यात असतील.

**– पुनित कुलट, पोलीस निरीक्षक, राजापेठ.**

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती –** आ.रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पार्टीचे पदाधिकारी निलेश भेंडे यांच्यावर शुक्रवारी (१ ऑगस्ट) संध्याकाळी स्थानिक शंकरनगर रोडवर दोन ते तीन दुचाकी वाहनांवरून आलेल्या अज्ञात हल्लेखोरांनी चाकूने प्राणघातक हल्ला केला. या हल्लूयात गंभीर जखमी झालेल्या भेंडे यांना तातडीने रेडियंट हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत.या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. नीलेश भेंडे हा शुक्रवारी संध्याकाळी ६ वाजताच्या सुमारास आमदार रवि राणा यांच्या निवासस्थाना समोरील सलूनमध्ये बसलेला होता. यावेळी दोन ते तीन दुचाकी वाहनांवरून आलेल्या अज्ञात हल्लेखोर तिथे पोहोचले



आणि त्यांनी भेंडेंवर चाकूने हल्ला चढवला. हल्लेखोरांनी भेंडेंच्या हातावर, छातीवर आणि पायावर १० ते १२ सपासप वार केले. या हल्लूयात भेंडे रक्तबंबाळ होऊन जमिनीवर कोसळले. हल्लूयाच्या वेळी परिसरात अनेक नागरिक उपस्थित होते, परंतु हल्लेखोरांनी वेगाने हल्ला चढवून घटनास्थळावरून पळ काढला. युवा स्वाभिमान पार्टीच्या कार्यकर्त्यांना या घटनेची माहिती मिळताच त्यांनी जखमी नीलेश भेंडे याला रेडीयंट हॉस्पिटलमध्ये दाखल केले. या हल्लूयाने स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हल्लेखोर अज्ञात व्यक्ती असल्याची माहिती आहे. त्यांची ओळख अद्याप पटलेली नाही. पोलिसांनी हल्लेखोरांचा शोध सुरू केला असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहे.



हल्लूयामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. निलेश भेंडे हे युवा स्वाभिमान पार्टीचे सक्रिय पदाधिकारी असल्याने हा हल्ला वैयक्तिक वैमनस्यातून किंवा राजकीय कारणांमुळे झाला असावा, असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. निलेश भेंडेंवर रेडियंट हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू असून, त्यांची प्रकृती गंभीर पण स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. स्थानिक नागरिक आणि पक्ष कार्यकर्त्यांनी रुग्णालयाबाहेर गर्दी केली आहे. पोलिसांनी हल्लेखोरांना लवकरात लवकर पकडण्याचे आश्वासन दिले आहे. 'या घटनेने शहरातील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

# गळयावर आढळले व्रणः गुरुकृपा कॉलनीमधील पोलिस महिलेचा घरातच संशयास्पद मृत्यू,, पीएम रिपोर्टनंतर होणार कारण स्पष्ट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती –**
शहरातील फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात कार्यरत असलेल्या ३८ वर्षीय पोलिस महिलेचा संशयास्पद मृत्यू झाल्याची खळबळजनक घटना शुक्रवारी (दि. १) सायंकाळी ७ वाजता उघडकीस आली. मृत महिलेच्या गळ्यावर व्रण दिसून आले आहेत. त्यामुळे या प्रकरणात घातपाताची शक्यता वर्तवण्यात येत असून, पीएम रिपोर्टनंतर मृत्यूचे नेमके कारण समोर येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. आशा राहुल धुळे (तायडे) (३८, गुरुकृपा कॉलनी, वडाळी, अमरावती) असे मृत महिलेचे नाव आहे.



आशा धुळे या फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात कार्यरत होत्या. त्यांचे पती राहुल तायडे राज्य राखीव पोलिस दल (क्रमांक ९, अमरावती) येथे पोलिस शिपाई या पदावर कार्यरत आहेत. १३ जुलैपासून आशा धुळे या वैद्यकीय रजेवर होत्या. त्यांना १४ वर्षांचा एक मुलगा तर ७ वर्षांची मुलगी आहे. शुक्रवारी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास त्या घरात एकट्या होत्या. त्यांचे पती मुलीला टच्यूशनला सोडण्यासाठी गेले होते तर मुलगा शाळेत गेला होता. मुलगा सायंकाळी पावणेसहा ते सहा वाजताच्या सुमारास घरात आला असता त्याला घरातून दोन व्यक्ती बाहेर पळत जाताना दिसले. यानंतर त्याने घरात प्रवेश केला असता त्याची आई बेडरूममधील



कॉटवर बेशुद्ध अवस्थेत पडलेली दिसली. त्याने आईला उठवण्याचा प्रयत्न केला परंतु आईने प्रतिसाद दिला नाही. यामुळे घाबरलेल्या मुलाने तात्काळ भाडेकरूंना माहिती दिली. त्यानंतर आशा धुळे यांना अत्यवस्थ स्थितीत इर्विनमध्ये आणले. मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच तायडे यांच्या घरी परिसरातील नागरिकांची गर्दी झाली. पोलिसांना घटनेची माहिती मिळताच फ्रेजरपुराचे ठाणेदार रोशन शिरसाट व पोलिस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. तसेच लागलीच पोलिस आयुक्त अरविंद चावरिया, डीसीपी गणेश शिंदे, एसीपी कैलाश पुंडकर यांच्यासह मोठ्या प्रमाणात पोलिस कुमक घटनास्थळी दाखल झाली होती. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवण्यात आला. आशा धुळे – तायडे यांचा मुलगा शाळेतून घरी आला, त्यावेळी त्याला दोन अनोळखी व्यक्ती तोंडाला स्कार्फ बांधून घरातून बाहेर पळताना दिसले. ते दोघेही तायडे यांच्या घराच्या मागील बाजूला असलेल्या दरवाजातून निघाले. ते घरात कोणत्या उद्देशाने आले होते, घरातील काही वस्तूंची चोरी झाली का, त्यांनी तोंडाला स्कार्फ बांधून चेहरा का झाकला, ते दोघे कोण होते असे अनेक प्रश्न उपस्थित झाले असून पोलिस सर्व बाजूने सखोल चौकशी करत आहेत. घटनास्थळी पोहोचलेले सीपी अरविंद चावरिया व पोलिस. घरात याच बेडवर आशा धुळे अत्यवस्थ पडून होत्या.

### मृत्यू संशयास्पद, सर्वच दिशेने चौकशी सुरू



प्रथमदर्शनी हा मृत्यू संशयास्पद वाटत आहे. त्यामुळे आम्ही सर्वच दिशेने चौकशी सुरू केली आहे. शवविच्छेदन अहवालाअंती मृत्यूच नेमके कारण समोर येईल. **–अरविंद चावरिया, सीपी**

# समृद्धीच्या बोगद्यात अडकली शेतीची वाट

## प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे साचतो अंरपास रस्त्यावर चिखल



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२डोणगाव–** डोणगाव शेतकऱ्यांसाठी समृद्धी महा मार्गाखालून बनवण्यात आलेल्या अंडरपासचे योग्य नियोजन न झाल्याने या ठिकाणी मोठया प्रमाणात गारा साचला आहे. परिणामी शेतकऱ्याच्या शेतीच्या समृध्दी ची वाट अडकल्याने शेतकऱ्यांत तीव्र नाराजीचे वातावरण आहे. गावापासून समृद्धी महामार्गाच्या दोन ते तीन किलोमीटर अंतरावर बनवलेले हे अंडरपास डोकेदुखी ठरले आहेत. शासनाची समृद्धी वाढविणारा, वाहनधारकांच्या सोयीचा असलेला हा मार्ग शेतकऱ्यांसाठी असुरक्षित ठरला आहे. डोणगाव शिवारातील अंजनी बुद्रुकसह जिल्ह्यातून गेलेल्या समृद्धी महामार्गावर विविध ठिकाणच्या अंडरपासची अशीच स्थिती आहे. शेतकऱ्यांना आपल्या शेतांमध्ये जाण्यासाठी पूर्वी पाणंद रस्ते होते. मात्र समृद्धी महामार्गाच्या निर्मितीमुळे रस्ते बंद झाले. या भागातून पलिकडच्या दिशेने जाताना शेतकऱ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी अंडरपास रस्ते बनवण्यात आले. सर्व्हिस रस्ते तयार करण्यात आले. परंतु हे रस्ते बनवताना योग्य नियोजन नसल्याने हा मार्ग आता शेतकऱ्यांसाठी डोकेदुखी बनू लागला आहे. महामार्गाचे काम सुरू झाले तेव्हा वहिवाट रस्ते नामशेष झाले, तर दुसरीकडे पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी असलेले नैसर्गिक मार्ग बंद झाले आहेत. समृध्दीच्या अंडरपासची नियोजन अभावी अशी अवस्था झाली.

# टीवोडी मीटर अचूक आणि मोफत ग्राहकांच्या बिलाबाबत तक्रार कमी होणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती–** ग्राहकांना अचूक व वेळेत वीजबिल देण्यास उपयुक्त ठरणारे अत्याधुनिक टीओडी वीजमीटर राज्यातील इतर जिल्ह्यांप्रमाणे अमरावती जिल्ह्यातही बसविण्यात येत आहेत. हे मीटर नवतंत्रज्ञानावर आधारित असून तांत्रिकदृष्ट्या ते अधिक स्मार्ट स्वरूपाचे असले तरी ते प्री-पेड नसून, पोस्टपेड आहेत. पूर्वीप्रमाणेच वीजवापरानंतरच ग्राहकांना वीजबिले मिळणार आहेत. हे मीटर मोफत बसवण्यात येत असून, ग्राहकांना कुठलाही आर्थिक भुर्दंड बसणार नसल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे.महावितरणच्या टिवोडी मीटरमध्ये मानवी हस्तक्षेपाला अजिबात वाव नाही. प्रगतशील तंत्रज्ञानाचा वापर वीजक्षेत्रात होणे ही काळाची गरज आहे.

ऑटोमॅटिक मीटर रीडिंगमुळे ग्राहकांना अचूक व वेळेवर बिले मिळतील. त्यामुळे वीजबिलाच्या संदर्भाने होणाऱ्या ग्राहक तक्रारीतही कपात होईल. सद्यस्थितीत कृषी वर्गवारी वगळता इतर सर्व वर्गवारीतील ग्राहकांना टीओडी मीटर बसविण्यात येत आहेत. अमरावती परिमंडळात जीनस या एजन्सीला हे काम दिले असून सुरुवातीच्या काळात सरकारी कार्यालये, सरकारी निवासस्थाने, मोबाईल टॉवर, नादुरुस्त मीटरच्या ठिकाणी हे टीओडी मीटर बसविण्यात आले आहेत.नवीन वीजजोडणी देतानाही टीओडी मीटर बसविण्यात येत असून, सोलार नेट मीटरिंगसाठीही त्याचा वापर करण्यात आला आहे. आतापर्यंत अमरावती जिल्ह्यात ९० हजार ३९ टीओडी मीटर बसविण्यात आले आहेत.नव्याने बसविण्यात येणारे वीजमीटर अत्याधुनिक व स्मार्ट स्वरुपाचे असले तरी ते प्री-पेड नाहीत किंवा ते बसविण्यासाठी व मीटरची किंमत म्हणून ग्राहकांकडून कुठलेही शुल्क आकारले जात नाही.

ग्राहकाने वापरलेल्या विजेची अचूक नोंद घेऊन योग्य वीजबिल देण्यास हे मीटर उपयुक्त ठरणार आहेत.शिवाय मीटर नादुरूस्त किंवा फॉल्टी मीटर असलेल्या ग्राहकांना त्यांच्या वापराचे अचूक वीज बिल देण्यासाठी या ग्राहकांना टिवोडी मीटर प्राधान्याने लावण्यात येत असल्याचे महावितरण अमरावती परिमंडळ कार्यालयाने स्पष्ट केले आहे.

# निवासी उपजिल्हाधिकारीपद अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रेणीमध्ये रूपांतरित करणार

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२नागपूर** –जिल्हा स्तरावर जिल्हाधिकाऱ्या नंतरनिवासी उपजिल्हाधिकारी हे पद महत्वाचे असून सर्वसामान्य नागरिकांच्या सुविधेसाठी ते पद अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रेणीमध्ये रूपांतरीत करण्यात येणार असल्याचे राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी येथे शुक्रवारी जाहीर केले.



नियोजन भवन येथे महसूल दिन व सप्ताहाचे उद्घाटन करताना ते बोलत होते. यावेळी आमदार परिणय फुके, चरणसिंग ठाकूर, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, महसूल अपर आयुक्त राजेश खवले, अपर जिल्हाधिकारी प्रविण महिरे, निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे उपस्थित होते.यावेळी महसूलमंत्री बावनकुळे यांच्या हस्ते आपले सरकार सेवा केंद्राचा पोर्टलचे अनावरण, नागपूर ग्रामीण कार्यालयाच्या संकेतस्थळाचे लोकार्पण, डिजिटल गाव नकाशा पोर्टलचे लोकार्पण. प्रधानमंत्री आवास योजना, जात प्रमाणपत्र वितरण, मालकीहक्काचे पट्टे वाटप, रेशन कार्ड वितरण, भूमिअभिलेख विभागातर्फे सनद वाटप करण्यात आले. मंत्रालयस्तरावर महसुलासंदर्भात प्रलंबित असलेल्या १३ हजार प्रकरणे निकाली काढण्याचा संकल्प असून त्याप्रमाणेच नायब तहसिलदार ते जिल्हाधिकारीस्तरापर्यंत प्रलंबित असलेले महसूली प्रकरणे येत्या तीन महिन्यात निकाली काढण्याचा झिरो पेन्डंसी उपक्रम राबवा, अशा सूचना महसूलमंत्री बावनकुळे यांनी दिल्या. महसूल दिनानिमित्त उत्कृष्ट कार्याबद्दल अधिकारी व कर्मचाऱ्यांचा स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

# राज्य शेतमजूर युनियन लालबावटा अधिवेशन, लढा दिल्याशिवाय मजुरांना पर्याय नाही

## विनोद गोविंदवार यांचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२तिवसा,**
शेतमजुरांच्या जीवनात परिवर्तन करण्यासाठी जोपर्यंत जमिनीचा लढा तीव्र करून जमिनी मिळवत नाही. तोपर्यंत शेतमजुरांच्या जीवनात परिवर्तन होत नाही, असे रोखठोक प्रतिपादन महाराष्ट्र राज्य शेतमजूर युनियनचे महाराष्ट्राचे सहसचिव कॉम्रेड. विनोद गोविंदवार यांनी केले. शेतमजुराच्या जिल्हा अधिवेशनाचे प्रमुख मार्गदर्शन करतेवेळी उपस्थित प्रतिनिधींना ते संबोधित करीत होते. तिवसा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात महाराष्ट्र राज्य शेतमजूर युनियन लालबावटाचे अमरावती जिल्हा अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. यावेळी शहिदांचा लालझेंडा फडकवून व शहीद स्तंभाला सलामी देऊन १२ व्या शेतमजूर युनियनच्या अमरावती जिल्हा अधिवेशनास सुरुवात झाली. या अधिवेशनात प्रमुख मार्गदर्शन राज्याचे सहसचिव कॉम्रेड विनोद गोवींदवार होते. यावेळी पुढे बोलतांना कॉम्रेड गोवींदवार म्हणाले की सरकारच्या मिळणाऱ्या जीवनात बदल म्हणाले, योजनावर खुश राहू नये. त्या तर मिळवून घ्यावाच पण करण्यासाठी सरकारच्या जनविरोधी धोरणाच्या विरोधात संघर्ष करावा लागेल आणि गावागावात शेतमजूर लालबावट्याची संघटना उभी करावी लागेल, असे प्रखर मत त्यांनी व्यक्त केले. या अधिवेशनात रामदास कारमोरे, चंदा देवघरे, तुषार गवळी या तीन लोकांचे अध्यक्ष मंडळ निवडण्यात आले होते. उद्घाटन सत्रातील संचालन कॉम्रेड जया




मेहरा यांनी केले. त्यानंतर संचालनाची

जबाबदारी अध्यक्ष मंडळाद्वारे पार पाडण्यात आली. मोहिनी शापामोहन, सुभाष खांडेकर, लता पापणकर, सोनू जाधव, संगीता खडसे, शोभा गोंडाने, वंदना राऊत, पुष्पा सौंदरकर आदी कार्यकर्त्यांनी अधिवेशन यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. रामदास कारमोरे यांना अध्यक्ष म्हणून तर दिलीप शापामोहन यांना सचिव म्हणून पुढील तीन वर्षासाठी निवडण्यात आले. दिलीप शापामोहन यांनी आपल्या भाषणात जिल्ह्याच्या अनेक तालुक्यात संघटना पोहोचवण्याचे आवाहन केले. प्रमुख वक्त्याच्या भाषणानंतर अधिवेशनाची जोरदार घोषणा देऊन यशस्वी सांगता झाली.

### विविध ठरावांना देण्यात आली मंजुरात

या अधिवेशनाचे उद्घाटन मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे अमरावती जिल्हा सचिव कॉम्रेड रमेश सोनुले यांनी केले. अखिल भारतीय किसान सभेचे नेते कॉम्रेड देविदास राऊत यांनी तसेच जनवादी महिला संघटनेच्या नेत्या पद्मा घरडे सोबतच शालेय पोषण कामगार संघटनेचे नेते कॉम्रेड महादेव गारपवार यांनी अधिवेशनाला शुभेच्छा व्यक्त केल्या. जिल्हा सचिव पुंडलिक पापणकर यांनी तीन वर्षाच्या कार्याचा अहवाल सादर केला. या अहवालावर अकरा प्रतिनिधींनी चर्चा करून अहवाल मंजूर करण्यात आला. मनोरगाच्या कामाची ठोस अंमलबजावनी करा. जन सुरक्षा विधेयकाचा धिक्कार असो. सर्व गरजू लोकांना घरकुलाचा लाभ द्या. अपंगासाठी ठोस उपाययोजना करा, आदी ठराव मांडण्यात आले व त्याला मंजुरात देण्यात आली.

# नफ्याचे आमिष देत १२.४० लाखांनी गंडविले

## अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती** आर्थिक लाभांचे आमिष देत अज्ञाताने शहरातील एका ४३ वर्षीय व्यक्तीची १२ लाख ४० हजारांनी फसवणूक केल्याची घटना घडली.राजू पंजाबराव काळे (४३, रा. अमरावती) असे फसवणूक झालेल्या व्यक्तीचे नाव असून त्यांनी सायबरमध्ये तक्रार नोंदवली. सविस्तर वृत्तानुसार, फिर्यादी राजू काळे खाजगी नोकरी करतात. त्यांनी जुलैत समाज माध्यम ावर एक शेअर मार्केट ग्रुपमध्ये सहभाग नोंदवला. तेथे त्यांचा एका लिंकद्वारे फॉर्म भरून घेतला. त्यानंतर त्यांना एक ॲप डाऊनलोड करून त्यावर प्रॉफिटचे आमिष देत ट्रेडींग करण्यास सांगीतले. त्यातून त्यांना काही आर्थिक फायदा झाला. ३ ते १६ जुलैदरम्यान त्यांनी ६ लाख १२ हजार व ६ लाख २८ हजारांची रक्कम गुंतवली. नंतर त्यांना आर्थिक फसवणूक झाल्याचे लक्षात आले. याबाबत त्यांनी सायबर सेलकडे तक्रार नोंदवली. अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# दारूची अवैध विक्री बंद करा;शिरजगावच्या महिला आक्रमक:

## कारवाई न झाल्यास मतदानावर बहिष्कारासह आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती–** चांदूर रेल्वे तालुक्यातील ग्रामपंचायत शिरजगाव कोरडे येथे सर्रास अवैध दारू विक्री सुरू असून, त्यामुळे महिलांना त्रास सहन करावा लागत आहे. अनेक युवकांनाही दारूचे व्यसन लागले आहे. काहींचा तर यात जीवही गेला आहे. अवैध दारू विक्रीमुळे गावातील सामाजिक व सांस्कृतिक वातावरण दूषित होत असल्याने जिल्हा प्रशासनाने तत्काळ गावात दारूबंदी करावी, या मागणीसाठी शुक्रवारी सरपंच सीमा बनसोड यांच्या नेतृत्वात गावातील महिला व पुरुष जिल्हाधिकारी कार्यालयासह पोलिस अधीक्षक कार्यालयावर धडकले. दोन्ही कार्यालयात त्यांनी निवेदन दिले.ग्रामपंचायतीने सर्वानुमते गावात



दारूबंदीचा ठराव केला आहे. जिल्हा प्रशासनासह ग्रामीण पोलिसांनीही गावात अवैध दारूबंदीसह चिवडा, भजे, कुरमुरे विकणाऱ्यांवर बंदी घालून गावकऱ्यांना न्याय द्यावा, अन्यथा मोठे आंदोलन करण्याचा तसेच आगामी निवडणुकीच्या मतदानावर बहिष्कार घालण्याचा निर्णय घातल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

गावातील मद्यपी बस स्थानकावर येऊन शिवीगाळ करतात. त्या ठिकाणाहून प्रतिष्ठित नागरिक, महिला, चिमुकले, विद्यार्थी-विद्यार्थ निंचे दररोज जाणे-येणे असते. त्यांना मद्यपींच्या वाढलेल्या उपद्रवाचा चांगलाच त्रास होत आहे. व्यसनाधीन तरुणांचे मृत्यू झाले असून त्यात आणखी भर पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. ते बघता अवैध दारू विक्रीवर बंदी असून विक्रेत्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात यावी, अन्यथा आम्ही आंदोलन केल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराही निवेदनात दिला. याप्रसंगी मोठ्या संख्येने पुरुष, महिला उपस्थित होत्या.शिरजगाव कोरडे येथील महिलांनी अवैध दारू विक्री बंद करण्याची मागणी पोलिस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे केली.

# डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय येथील रक्तपेढीला एनएबीएचची मान्यता

## पश्चिम विदर्भातील पहिली डॉ. पंजाबराव देशमुख रक्तपेढी एनएबीएचने मानांकित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

श्री शिवाजी शिक्षण संस्था व्दारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय संलग्न डॉ. पंजाबराव देशमुख रक्तपेढी य रक्तविघटन केंद्राला नॅशनल ॲक्रिडिटेशन बोर्ड फॉर हॉस्पिटल्स् ॲन्ड हेल्थ केअर प्रोव्हायडर (छ-इक) कडून सर्टिफिकेट ऑफ ॲक्रिडिटेशन नुकतेच प्राप्त झाले आहे. पश्चिम विदर्भात एनएबीच ॲक्रिडिटेशन मिळविणारी डॉ. पंजाबराव देशमुख रक्तपेढी पहिली ठरली आहे. भारतीय गुणवत्ता परिषद घटक मंडळाकडून (कॉन्स्टीटच्यूअंट बोर्ड ऑफ क्वालीटी कौन्सील ऑफ इंडिया) रक्तपेढीचे पुर्व मुल्यांकन ०२ मार्च २०२५ झाले होते, त्यानंतर अंतिम मुल्यांकन १२ मे २०२५ रोजी करण्यात आले होते. एनएबीएच कडून प्राप्त मान्यता प्रमाणपत्राची मुदत तीन वर्षांसाठी आहे.




एनएबीएच मान्यतेमूळे रक्त संकलन, प्रक्रिया तपासणी आणि वितरणात मानकांचे पालन होते तसेच रक्त आणि रक्तघटक सुरक्षितरित्या, योग्य प्रमाणात आणि योग्य येळेत उपलब्ध होतात. रक्तपेढीमध्ये ठरलेले कार्यालयीन नियम, डॉक्यूमेंटेशन, अंतर्गत ऑडिट, व्यवस्थापन पुनरावलोकन यांसारख्या ठोस प्रक्रियांची अंमलबजावणी होते.

याआधी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय नॅक कडून मानांकित झालेले आहे. महाविद्यालय व रूगणालयाला प्राप्त होत असलेल्या महत्वपुर्ण उपलब्धी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री हर्षवर्धनजी देशमुख, संस्थेच्या कार्यकारी परिषदेचे पदाधिकारी, सचिव यांचेकडून वेळोवेळी मिळत असलेले मार्गदर्शन व सहकार्य तसेच महाविद्यालय व रुग्णालय प्रशासन, विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या अथक परिश्रमामूळेच दिवसेंदिवस प्रगतीकडे वाटचाल सुरू असल्याचे मत पीडीएमसीचे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांनी व्यक्त केले आहे. तसेच ज्या विभागांची एनएबीएच व एनएबीएल मान्यता अप्राप्त आहे त्यांचेकडून आवश्यक कार्यवाही सुरू आहे. महाविद्यालय व रूग्णालयाला प्राप्त होत असलेले यशाबद्दल प्रशासनाचे सर्वच स्तरातून अभिनंदन होत आहे.

# अभिनंदन !!!




**अरुणा श्रीरामपंत वाडेकर यांनी शुक्रवार दि.१ऑगस्ट २५ ला महिला महाविद्यालयच्या प्रभारी प्राचार्य म्हणून पदभार स्वीकारला. त्यावेळी दैनिक विदर्भ प्रजासत्ताक च्या संपादिका व महिला महाविद्यालयाच्या प्रा.शुभांगी जोशी यांनी गुलाब पुष्प देऊन शुभेच्छा दिल्यात.**

# जिल्हापरिषद बांधकाम विश्रामगृह बनले अनेक समस्यांचे माहेरघर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२दर्यापूर**

दर्यापूर येथे बांधकाम विभाग, जिल्हा परिषद अमरावतीच्या माध्यमातून उभारण्यात आलेले विश्रामगृह सध्या दुरवस्थेला पोहचले असून, त्या ठिकाणी असलेल्या मूलभूत सुविधा देखील उपलब्ध नसल्याने हे विश्रामगृह अनेक समस्यांचे माहेरघर ठरू लागले आहे.

नुकताच भारताचे सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश मा. भूषण गवई दोन तास या विश्रामगृहात थांबले. मात्र, त्यांच्या भेटीनंतर या ठिकाणी असलेल्या असुविधांची वास्तव स्थिती उघडकीस आली. समोरून आकर्षक दिसणारी ही इमारत आतून मात्र निष्काळजीपणाचा आणि बेपर्वाईचा नमुना बनली आहे.या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय नाही. वॉटर कुलर असूनही त्यात कपडे आणि खराब चादरींची अडगळ भरलेली आहे. प्रवाशांसाठी कोणतीही नाश्ता वा जेवणाची सोय नाही. ना आचारी, ना व्यवस्थापक. विश्रामगृह म्हणावे असे काहीही येथे आढळून येत नाही.सरन्यायाधीशांच्या भेटीदरम्यान जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यपालन अधिकारी (उएज) आणि इतर अधिकारी देखील उपस्थित होते. मात्र, त्यांनी या बाबीकडे दुर्लक्ष केल्याचे चित्र आहे. विश्रामगृहाचा दर्जा आणि कार्यपद्धती यावर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

**तत्काळ उपाययोजनांची गरज**

दर्यापूरसारख्या शहरात उभारलेले हे भव्य बांधकाम केवळ शोभेची वस्तू न राहता प्रत्यक्ष उपयोगात यावे, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष घालून त्याची दुरुस्ती, देखभाल आणि आवश्यक सुविधा पुरवण्याची मागणी आता जनतेतून जोर धरू लागली आहे.

# शाळांच्या दुरुस्ती, नवीन बांधकामासाठी २३.८८ लाख मंजूर

## जिल्ह्यातील झेडपीच्या शाळा चकाकणार : २५८ वर्गखोल्यांची दुरुस्ती६८ नवीन बांधकाम मात्र रखडले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

जिल्हा नियोजन समितीकडून यंदा जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये ९७६ नवीन वर्गखोल्यांकरिता १३ कोटी व दुरुस्तीकरिता १० कोटी ८८ लाख ९० हजार रुपये असा एकूण २३ कोटी ८८ लाख ९० हजारांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. परंतु, मागील वर्षीच्या नियोजनामधून प्रस्तावित असलेल्या २५८ शाळांची दुरुस्ती व ६८ नवीन वर्ग खोल्यांची कामे शाळा सुरू




झाल्यामुळे आता पावसाळ्यामुळे रखडली आहेत.जिल्हा परिषदांच्या बहुतांश शाळांची खस्ता हालत झाली आहे. त्यामुळे प्रशासनाकडून विविध टप्यात शाळा दुरुस्तीचे नियोजन करण्यात आले आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये जिल्हा नियोजन समितीच्या ७८० लाखबांधकामे करण्यात आली. तसेच ७११ रुपयांच्या निधीतून ५३ शाळांमध्ये ६० नवीन लाखांच्या निधीतून २१२ शाळांच्या वर्ग खोल्यांची दुरुस्ती करण्यात आली. २०२४-२५ या आर्थिक वर्षात १४ कोटी ४० लाखांच्या निधीतून ४१० वर्गखोल्यांच्या दुरुस्तीचे काम मंजूर करण्यात आले असून यापैकी १२० कामे पूर्ण झाली आहे. २५८ कामे सध्या सुरू आहेत. उर्वरित ३२ कामांसाठी कार्यारंभ आदेश प्रक्रियेत आहेत. नवीन वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी १२ कोटी ३५ लाखांचा निधी प्राप्त असून त्यातून ८७ वर्गखोल्यांची कामे हाती घेण्यात आली आहेत. यातील ४ कामे पूर्ण झाली असून ६८ कामे प्रगतीपथावर आहेत. आगामी आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी शाळा दुरुस्तीसाठी १० कोटी ८८ लाख ९० हजार आणि ९७६ नवीन वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी १३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. तसेच २०२५-२६ साठी ७० लाखांची तरतूद असून, नुकत्याच वादळामुळे नुकसान झालेल्या २१ शाळांसाठी ४८ लाख रुपयांच्या तातडीच्या दुरुस्ती कामांवर प्रक्रिया सुरू आहे.

# हृदयस्पर्शी सेवा : शस्त्रक्रियेनंतर रुग्णांसाठी आसनांची सुविधा केली उभी

## श्री संत अच्युत महाराज हॉस्पिटल,अमरावती येथे साकार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

नांदुरा बु., ता. जि. अमरावती येथील बंग परिवाराने त्यांच्या पूज्य मातोश्री श्रीमती निर्मलादेवी रामरतनजी बंग यांच्यावर श्री संत अच्युत महाराज हॉस्पिटल, अमरावती येथे यशस्वी शस्त्रक्रिया झाल्यानंतर हॉस्पिटलप्रती कृतज्ञता व सेवाभाव व्यक्त करत रुग्णांसाठी आसन व्यवस्थेच्या स्वरूपात ७५ हजार रुपये किमतीचे १५ बेंचेस दान केले.

या बेंचेसचे लोकार्पण १ ऑगस्ट रोजी प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हॉस्पिटलचे अध्यक्ष डॉ. अनिलपंत सावरकर होते. यावेळी संचालक डॉ. गुणवंत डहाणे, डॉ. श्रीकांत देशमुख, श्री रमेशपंत सावरकर, श्रीमती शुभदा पोतदार, डॉ. सुधीर जोशी, श्री राजेंद्र दिगंबर व सर्व संचालक मंडळ उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून माजी जिल्हा परिषद सदस्य श्री प्रकाशदादा साबळे, श्री राजेश बंग, डॉ. शैलेश जाजू, श्री प्रमोद बंग, श्री देवेंद्र राठी, श्री सुमंत पाटील, श्री पंकज काळबांडे, श्री अक्षय सरोदे यांची उपस्थिती होती.या वेळी हॉस्पिटलच्या वतीने पूज्य मातोश्री श्रीमती निर्मलादेवी बंग यांचा तसेच रुग्णसेवक व माजी जिल्हा परिषद सदस्य श्री प्रकाशदादा साबळे यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन डॉ. अनिल सावरकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी ट्रस्टी डॉ. गुणवंत डहाणे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# श्री समर्थ लहानुजी महाराज यांच्या पुण्यतिथी महोत्सवाला आज पासून सुरवात

## श्रीक्षेत्र टाकरखेडा येथे भरणार भक्तांचा मेळावा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२तिवसा**

तिवसा तालुक्यातील श्रीक्षेत्र टाकरखेडा येथे श्री समर्थ लहानुजी महाराज यांचा दरवर्षी पुण्यतिथी महोत्सव मोठ्या आनंदाने व धार्मिक उत्साहात पार पडत असतो आणि याच कार्यक्रमाचे यावर्षीचे उचित्य साधून संत परंपरा वारसा लाभलेले श्री समर्थ परमहंस लहानुजी महाराज यांचा पुण्यतिथी महोत्सव दिनांक दोन ते नऊ ऑगस्ट दरम्यान भक्तीभावाने साजरा होणार आहे दरवर्षीप्रमाणे यावर्षी हा सोहळा धार्मिक सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांनी सजलेला असणार आहे. आठवडाभर चालणाऱ्या पुण्यतिथी महोत्सवात तीर्थ स्थापना महाप्रसाद सामूहिक प्रार्थना व चिंतन मोहन साधना सामूहिक ध्यान रामधुन, ग्राम फेरी, समाधी व मूर्तीचे अभिषेक पूजन, श्री लीलामृत ग्रंथाचे सामूहिक पारायण, पंचपदी हरिपाठ, काल्याचे किर्तन, संगीत, अभंग वाणी महाआरती श्रद्धांजली गीत, व अनेक सामाजिक उपक्रमांचे या आठवड्याभरात आयोजन करण्यात आले आहे या महोत्सवासाठी श्री समर्थ लहानुजी महाराज प्रार्थना सेवा मंडळ व ध्यान कार्यक्रमाची तर श्री लहानजी महाराज वारकरी सेवा मंडळ आणि सभा मंडप परिसर व्यवस्था पाहणार आहे तसेच लहानुजी नवदुर्गा मंडळ बाल दुर्गा मंडळ महिला बचत गट अशी अनेक प्रकारची संघटना या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त आपले कार्य दरवर्षीप्रमाणे चोक अशा व्यवस्थेत बजावत आहे. तसेच आयोजक मंडळाकडून यावर्षी या भव्य दिव्य कार्यक्रमाचं आयोजन केले गेले असल्याने या कार्यक्रमाचा समस्त भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाला वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री श्री पंकज भोयर, खासदार अमर काळे, आमदार दादारावजी केचे, आमदार सुमित वानखडे, आमदार राजेश वानखडे, माजी आमदार ॲड. यशोमतीताई ठाकूर, पुष्पाताई बोंडे, लक्ष्मणराव गमे, जनार्दन पंत बोथे, कृष्णा गिरधर, अभिजीत बोके, विलास साबळे, अशा असंख्य मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.संतांचा मार्ग हा भक्तीचा दीप आहे, आणि टाकरखेड त्याचा उजळून टाकणारा दिवा!

# श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टला विधी कॉलेजची मान्यता

## तक्षशिला विधी महाविद्यालय सुरू पाच वर्षीय अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना संधी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

स्थानिक श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती द्वारा संचालित, तक्षशिला लॉ महाविद्यालयाला शैक्षणिक सत्र २०२५-२६ पासून प्रवेश घेण्याची महाराष्ट्र शासन व बार कौन्सिल ऑफ इंडियाकडून मान्यता प्राप्त झाली आहे. बीकॉम एलएलबी हा पाच वर्षीय अभ्यासक्रम संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात प्रथमच सुरु करण्याची संधी श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टला प्राप्त झाली आहे.



अमरावती विद्यापीठ जिह्यातील, परिसरातील विद्यार्थ्यांना आता बीकॉम एलएलबी करण्यासाठी इतर विद्यापीठात जाण्याची गरज राहणार नाही.तक्षशिला विधी महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय परिसर, उत्तमनगर, महादेव खोरी रोड, अमरावती येथे संस्थेच्या प्रशस्त जागेवर सुरू करण्यात आले आहे. विधी महाविद्यालयामध्ये सर्वच प्रकारच्या सुविधा संस्थेने उपलब्ध करून दिल्या आहेत. ज्यामध्ये उच्च विद्याविभूषित प्राध्यापक वर्ग, सुविधायुक्त इमारत, मूट कोर्ट, डिजिटल लायब्ररी, प्रशस्त जलतरण केंद्र, क्रीडांगण, इंडोर हॉल, अत्याधुनिक जिम इत्यादी सुविधा उपलब्ध आहेत.तक्षशिला विधी महाविद्यालय, उत्तमनगर, अमरावती येथे इंटिग्रेटेड बी.कॉम. एल.एल.बी. या पाच वर्षे अभ्यासक्रमाला प्रवेश देण्यात येत असून विधी अभ्यासक्रमाचे सी.ई.टी. दिलेले बारावी उत्तीर्ण विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतात. असे आवाहन श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव डॉ. कमलाकर पायस यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# विद्यापीठात 'होलिस्टिक ॲन्ड मल्टीडिसिप्लीनरी एज्युकेशन' विषयावर राष्ट्रीय कार्यशाळा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील शारीरिक शिक्षण विभाग व मालवीय मिशन टिचर ट्रेनिंग सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान अंतर्गत दि. ०४ ते ०९ ऑगस्ट, २०२५ दरम्यान 'होलिस्टिक ॲन्ड मल्टीडिसिप्लीनरी एज्युकेशन' या विषयावर आणि 'ऑल राऊंड डेव्हलपमेंट थ्रू मल्टीडिसिप्लीनरी ॲप्रोच 'या थीमवर साप्ताहीक राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेचे उद्घाटन ०४ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वा. होणार असून उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्रमुख अतिथी म्हणून व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. मनीषा कोडापे, अधिसभा सदस्य डॉ. सुभाष गावंडे यांची उपस्थिती राहणार आहे.

कार्यशाळेत शिक्षण क्षेत्रातील विविध पैलूंवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन होणार असून या कार्यशाळेचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. तनुजा राऊत यांनी विद्यापीठाच्यावतीने केले आहे.

# चिखलदरा पंचबोल पॉईंटवर पर्यटक व जिप्सी चालकांमध्ये वाद

## मारहाणीचा व्हिडिओ व्हायरल, पोलिसांनी केली पर्यटकांची सुटका




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२चिखलदरा**

विदर्भाचे नंदनवन म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चिखलदऱ्यामध्ये पर्यटकांची गर्दी सध्या मोठ्या प्रमाणात पाहायला मिळते. मात्र, या पर्यटनस्थळी एका दुर्घटनेने खळबळ उडवली आहे. पंचबोल पॉईंट येथे गाणे गाण्याच्या वादातून पर्यटक आणि जिप्सी चालकांमध्ये बाचाबाची झाली आणि पाहता पाहता ती मारहाणीमध्ये रूपांतरित झाली.

जिप्सी चालकाने काही पर्यटकांना जोरदार मारहाण केली. या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. मारहाणीच्या घटनेनंतर संबंधित चालकाचे इतर साथीदारही एकत्र झाले आणि पर्यटकांवर हल्ला करण्याच्या उद्देशाने त्या ठिकाणी थांबले होते. घाबरलेले पर्यटक जवळच्याच भागात लपून बसले.

दरम्यान, ही माहिती मिळताच चिखलदरा पोलीस ठाण्याचे एपीआय प्रवीण पाटील यांनी तात्काळ दखल घेतली. आपल्या ताफ्यासह त्यांनी पंचबोल पॉईंटवर धाव घेतली आणि पर्यटकांची सुखरूप सुटका केली. पोलिसांच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला.

या घटनेमुळे चिखलदऱ्यातील पर्यटन व्यवस्थेवरील प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, जिप्सी चालकांच्या अनिर्बंध वर्तणुकीबाबत प्रशासनाने कारवाई करण्याची मागणी होत आहे. दरम्यान, चिखलदरा पोलीस पुढील तपास करत असून, दोषींवर कठोर कारवाई केली जाणार असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले.

# ‘वसा’ संस्थेच्या सामाजिक कार्याचा गौरव सोमेश्वर पुसतकर पुरस्काराने सन्मान





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

आजच्या आधुनिक काळामध्ये प्रत्येक युवक केवळ स्वतःच्या उज्वल भवितव्य साकारण्याकरीता धडपड करीत आहे. कौटुंबीक सौख्य आणि सामाजिक बांधीलकीचे भान नसलेल्या आजच्या युवाशक्तीला काही तरूणांनी भुतदयेचा 'वसा' जोपासत समाजाला एक नवी दृष्टी आणि प्रेरणा दिली आहे. क्षण होता, सर्वसामान्यांच्या मदतीला धावणारा भुमीपूत्र स्व. सोमेश्वर पुसतकर यांच्या पुण्यस्मरण दिनानिमीत्त्य लोक फाऊंडेशन द्वारे सोमेश्वर पुसतकर लोकगौरव पुरस्कार वितरण सोहळ्याचे. श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या स्व. सोमेश्वर पुसतकर सभागृह येथे शुक्रवार दि.१ ऑगस्ट रोजी सांय. ५ वा. पुरस्कार वितरण सोहळयामध्ये अमरावतीच्या तरूणांनी भुतदयेचा वारसा जोपासण्याकरीता सुरू केलेल्या वसा संस्थेला यंदाचा सोमेश्वर पुसतकर लोकगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून वनराई नागपुर ने विश्वस्त गिरीश गांधी उपस्थीत होते. प्रमुख अतिथीमध्ये मनपा आयुक्त सोम्या शर्मा, एड. आर.बी अटल, जिजाऊ बँकचे अध्यक्ष अविनाश कोठोळे, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे आदी मान्यवर उपस्थित होते.स्व.सोमेश्वर पुसतकर यांनी आपल्या हयातील शेकडों गरजू लोकांना मदत केली. जात, पात, धर्म विचारधारा, संघटना यांचा विचार न करता त्यांनी समाजातील वेगवेगळ्या घटकांना कायम ताकत देण्याचे काम केले. स्व. सोमेश्वर पुसतकर यांच्या कार्याचा बारसा अविरत रहावा, याकरीता लोक फाऊंडेशन, कृषी विकास प्रतिष्ठान नागपुर व सोमेश्वर पुसतकर मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पुरस्कार सोहळयाची सुरुवात दिपप्रज्वलनाने झाली. जखमी, आजारी, अनाथ आणि अपंग प्राणी, पक्षी यांचा उपचार, काळजी, निवारा, पोषण आणि पुर्नवसन करणारी वसा संस्थेला एक लक्ष रूपये व स्मृति चिन्ह प्रदान करोत यंदाच्या सोमेश्वर पुसतकर लोकगौरव पुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात आले. वसा संस्थेचे अध्यक्ष शुभम सायंके, पुष्ण सायंके, निखील फुटाणे, गणेश अकर्ते यांच्यासह वसा संस्थेचे सर्व तरूण सदस्य आणि पदाधिकारी यांनी या गौरव पुरस्काराचा स्विकार केला.

या लोकगौरव पुरस्कार सोहळ्याला मार्गदर्शन करतांना आर. वो अटल यांनी वसा संस्थेच्यावाटचालीची महिती दिली. ते म्हणाले, प्रत्येक व्यक्ती, संस्थेच्या मदतीकरीता निःस्वार्थपणे घाव घेणारा सोमेश्वर पुसतकर यांच्या स्मरनार्थ यंदाचा लोकगौरव पुरस्कार वसा संस्थेला देतांना समाजाला, युवापीढीला एक नवी प्रेरणा दिली आहे. भुतदयेचा वसा जोपासण्याकरीता २०११ मध्ये स्थापन वसा संस्थेने पशू-पक्षांच्या संवर्धनाकरीता घेतलेला पुढाकार प्रेरणादायी आहे. या संस्थेच्या कार्याला स्थानिक लोकप्रतिनिधी, शासन प्रशासन आणि समाजातून मदत कार्याची गरज असल्याचे आवाहन केले. मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांनी वसा संस्था व पदाधिकाऱ्यांची प्रशंसा करीत वसा संस्थेच्या कार्याला मनपा प्रशासन सहकार्य करणार अशी ग्वाही देत बसा संस्थेचे कार्य अमरावतीच्या वैभवामध्ये भर टाकणारे असल्याचे मत व्यक्त केले. जाजाऊ बँकेचेअध्यक्ष अविनाश काठोळे यांनी वसा संस्थेच्या विकासाकरीता सहकार्य करणार असे आश्वासन दिले.कार्यक्रमाचे अध्यक्ष गिरीश गांधी यांनी प्रेरणादायी मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अविनाश असनारे यांनी केले. संचालन विशाल तराळ तर आभार वैभव दलाल यांनी मानले. या प्रेरणादायी पुरस्कार वितरण सोहळ्याला सर्व क्षेत्रातील व्यक्तीमत्व व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दर्जाहीन सिमेंटच्या रिपॅकिंगचे राज्यभर जाळे

## गाळण करून नामांकित कंपनीच्या पोत्यात भरायचे अन विकायचे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**



तीन नामांकित कंपनीच्या 'एक्सपायर' झालेल्या सिमेंटची त्याच कंपनीच्या बॅगमध्ये रिफिलिंग करून त्याच्या विक्रीच्या अवैध धंद्याचा गुन्हे शाखा युनिट एकच्या पोलिस पथकाने गुरुवारी पर्दाफाश केला. पोलिसांनी मासोद, काटआमला व नवसारीस्थित गोडाऊनमधून त्या निकृष्ट सिमेंटची १४४६ पोती जप्त केली. याप्रकरणी पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले होते. त्यांना १ ऑगस्टला स्थानिक न्यायालयात हजर करण्यात आले. त्यांना न्यायालयीन कोठडीअंतर्गत जेल रवाना करण्यात आले. दर्जाहीन सिमेंटच्या रिपॅकिंगचे हे जाळे महाराष्ट्रभर पसरले असून, स्थानिक दोघेजण हे त्यातील 'छोटी कडी' असल्याचे तपासांत समोर आले आहे. शेख शाहरूख शेख रशीद हस्नवाले (वय ३२, रा. राहुलनगर) व अफजल हुसैन कालीवाले (रा. गवळीपुरा) अशी अटक आरोपींची नावे आहेत. मासोद येथील एका शेतामधील गोडावूनमध्ये पीआय गोरखनाथ जाधव यांच्या टीमने गुरुवारी रात्री छापा टाकला होता. तेथून शेख शाहरूख याला पकडण्यात आले.

> मुदतबाह्य व निकृष्ट दर्जाच्या सिमेंटचे रिपॅकिंग करून ते विकण्याचा अवैध धंद्याचे महाराष्ट्रातच नव्हे, तर देशाच्या कानाकोपऱ्यांत मोठे रॅकेट आहे. स्थानिक दोघे त्यातील 'छोटी कडी' आहे. आरोपींनी निकृष्ट दर्जाचे ते सिमेंट तूर्तास येथेच विकल्याचे समोर आले आहे.
>
> **– गोरखनाथ जाधव, पोलिस निरीक्षक, गुन्हे शाखा.**

त्याच्याकडून काटआमला शिवारातील युसूफ (रा. गवळीपुरा, बडनेरा) यांच्या शेतातील गोडाऊन व नवसारी भागातील ईर्शाद कालीवाले याच्या गोडाऊनमधूनही तोच अवैध धंदा सुरू असल्याचे उघड झाले.

मासोद येथे अंदाजे ९०८ बॅग, काटआमला येथे ४०० बॅग, नवसारी येथे १३८ बॅग अशा एकूण १४४६ निकृष्ट दर्जाचे सिमेंट भरून रिपॅकिंग केलेल्या बॅग, नामांकित कंपनीच्या रिकाम्या बॅग्स, सिमेंट रिपॅकिंग करण्याकरिता वापरलेले साहित्य, मालवाहू वाहन असा एकूण ११.७१ लाखांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला. त्या रिकाम्या बॅग्स आरोपींनी नागपूर व स्थानिकांकडून विकत घेतल्या होत्या.

### यांना विकले ते सिमेंट

मुदतबाह्य सिमेंटची नामांकित कंपनीच्या बॅगेत रिपॅकिंग करून ते शहरातील तीन दुकानदार, एक अभियंता व एका ठेकेदाराला विकत असल्याचे प्राथमिक तपासांत समोर आले आहे. बाजारभावापेक्षा ३० ते ५० रुपये कमी दराने विशिष्ट ग्राहकांनाच मागणीच्या तुलनेत कमी पोती दिली जात होती.

# महिला पोलीसाची हत्या पतीच निघाला संशयित

## पती फ्रेजरपुरा पोलिसांच्या ताब्यात : घटनेचा कसून तपास सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२अमरावती**

अमरावती शहरात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या महिला पोलीस अंमलदार आशा धुळे (तायडे), वय ३८ वर्षे यांची गुरुकृपा कॉलनी येथील राहत्या घरी गळा दाबून हत्या करण्यात आलीशुक्रवारी रात्री उशिरा ही घटना उघडकीस आल्यानंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणात महिला पोलीस अंमलदाराच्या पती राहुल तायडे याला पोलीसांनी रात्रीच ताब्यात घेतले असून चौकशी सुरू आहे.

या घटनेच्या तपासात एक महत्त्वाचा भाग म्हणजे मृतक आशा धुळे यांच्या बहिणीने दिलेल्या पोलिस तक्रार, ज्यावरून पुढील कारवाई केली जात आहे.दरम्यान, पोस्टमार्टम अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. मात्र, प्राथमिक तपासात हत्या गळा दाबून झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.सध्या आरोपी



पतीकडून विचारपूस सुरू असून, या घटनेच्या पार्श्वभूमीवर पतीवर कौटुंबिक वादातून हत्या केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.ही घटना पोलीस दलाच्या अंतर्गत सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी असून, अधिक तपास फ्रेजरपुरा पोलीस स्टेशनकडून सुरू आहे.

# नगरपरिषदच्या निवडणुकीसाठी जोमाने कामाला लागा

## दबंग नेता बबलू देशमुख यांचे जुळ्या शहरातील पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२परतवाडा**

जिल्हा कॉंग्रेस कमिटी अध्यक्ष बबलू उर्फ अनिरुध्द देखमुख यांनी आगामी नगरपालिकाच्या निवडणुकीसंदर्भात कृषी उत्पन्न बाजार समिती येथे अचलपूर - परतवाडा शहर कॉंग्रेसच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली.

अचलपूर नगरपालिका निवडणुकांसाठी जोमाने कामाला लागा, असे निर्देश त्यांनी कॉंग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांना यावेळी दिले.निवडणुका संपूर्ण ताकदीनिशी लढायच्या आहेत.आतापासूनच जोरदार तयारी सुरू करा. नगरपालिकांमध्ये पक्षाच्या वॉर्ड बैठका घेऊन संघटना बळकट करा, असे निर्देश जिल्हा कॉंग्रेस अध्यक्ष बबलू देशमुख यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना दिले. २०१६ मधे कॉंग्रेसचे सात व कॉंग्रेस समर्थीत तीन नगरसेवक निवडून आले होते व नगर अध्यक्ष पद थोडक्यात हूकले होते मागच्या वेळेस झालेल्या चूका या वेळेस व्हायला नको व न.प. अचलपूर अनेक समस्याचें माहेर घर असून लोकांची कामे करणाऱ्यानाच उमेदवारी देणार असल्याचे बबलू देशमूख यांनी सांगीतले. सदर आढावा बैठकीचे आयोजन शहर अध्यक्ष श्रीकांत झोडपे यांनी केले होते.समीक्षा बैठकीमध्ये तालूका ग्रामीण अध्यक्ष नामदेव तनपूरे,महेरूल्ला सेठ,कैलाश आवारे,अतेहशामभाई,बाजार समीती उपसभापती अमोल चिमोटे,सेवादल अध्यक्ष कदीर पहेलवान,अजीज खान,सईद मौलाना,अहेमद भाई,एतेशाम नबील,शाकीर भाई,निकेश दाभाडे,,नईम भाई,मजीद ठेकेदार,अन्सार भाई,जी एम खान,सागर व्यास,अकबर सर,दीनेश वानखडे,हरदासजी वानखडे,नासीर शहा,राजा शहा,मतीन खान,आबीद खान, जहीर भाई,पप्पू नवाब,रमेश रावेकर,रामभाऊ ऊमक,राजेद्रं दाभाडे,राजेश हीवराळे,मोहन हीवराळे,बंडू भाऊ साने,फीरोज भाई,ममदू राजा,रम्मू भाई,वसीम भाई,रशीद पहेलवान,सच्चीता नंद बेलसरे,सूधाकर तायडे,संजय शेटे,संजय धमेले,रामकृष्ण डांगे,कीसनराव तंतरपाळे,राजीक भाई रफीक भाई, जयसींगपूरेसह शेकडो कॉंग्रेस पदाधिकारी,कार्यकर्ते उपस्थीत होते.

# थकित देयके अदा न केल्यामुळे महावितरण कंत्राटदारांवर उपासमारीची पाळी; कंत्राटदारांचे कामबंद आंदोलन सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अचलपूर**



थकित देयके अदा न केल्यामुळे महावितरण कंत्राटदारांवर उपासमारीची पाळी आली असून थकित देयके अदा करावे यासाठी कंत्राटदारांनी कामबंद आंदोलन सुरू केले आहे.महावितरण विभागीय कार्यालयाअंतर्गत ३५ ते ४० नोंदणीकृत कंत्राटदार असून त्यांच्याकडून महावितरणची विद्युतविषयक कामे करून घेतली जातात. २०२४ २५ या आर्थिक वर्षात कंत्राटदारांनी मोठ्या प्रमाणात कामे केली. त्यावर त्यांनी लाखो रुपये खर्च केले. प्रसंगी दागिने गहाण ठेऊन आणि बँकेकडून आणि खाजगी सावकारांकडून व्याजाने कर्जाऊ रक्कम घेतली. आज ना उद्या देयक निघेल, शासन निधी देईल याआशेवर कंत्राटदार होते. उल्लेखनीय म्हणजे मागील वर्षाचे पैसे अद्याप तर निघालेच नाही शिवाय २०२५-२६ या वर्षातही कामे करून घेतली गेली. मात्र अद्यापही कंत्राटदारांना कामाचा मोबदला देण्यात आला नाही. त्यामुळे कंत्राटदार अतिशय आर्थिक संकटात सापडले आहे. बँकेचे नियमित हप्ते भरले जात नसल्याने ईएमआय बाऊन्स होत आहे. शिवाय खाजगी सावकरांचापैशासाठी तगादा सुरू आहे. त्यामुळे कंत्राटदार प्रचंड आर्थिक संकटात आहेत. इतकेच नव्हे मानसिक स्वाथ्यावरही तर परिणाम झाला आहे. त्यामुळे जोपर्यंत महावितरण केलेल्या कामाचे देयके काढत नाही तोपर्यंत काम बंद राहणार असल्याचा निर्णय संघटनेने घेतला असल्याची माहिती संदीप देवरणकर, गजानन डाफे, सुयोग खाडे, सर्वेश अग्रवाल यांनी दिली आहे.

# ‘भीमराया’ म्हणत सरन्यायाधीश गवईंचा गळा दाटला, डोळे पाणावले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२नागपूर**

‘भीमराया घे तुझ्या या लेकरांची वंदना.. आज घे ओथंबलेल्या अंकुरांची वंदना.. कविवर्य सुरेश भट यांनी लिहिलेले हे केवळ एक गीत नव्हे तर ती बाबासाहेबांना अर्पण केलेली अनुयायांची भावना होय. त्यातील प्रत्येक शब्द हा हृदयातून बाहेर पडतो. त्यामुळेच हे गीत गाताना कोट्यवधी आंबेडकरी अनुयायांचा कंठ दाटून येतो. डोळे पाणावतात. अशीच काहीसी अवस्था आज देशाचे सरन्यायाधीश न्या. भूषण गवई यांची झाली. त्यांनी या अजरामर गीताच्या निर्मितीची कहानी सांगत संपूर्ण गीत सादर केले. यावेळी त्यांचा कंठ दाटून आला. डोळे पाणावले. यावेळी संपूर्ण सभागृह स्तब्ध होऊन ऐकत होता.

निमित्त होते. दीक्षाभूमीतील डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या हिरक महोत्सवी कार्यक्रमाचे. शनिवारी हा कार्यक्रम दीक्षाभूमीतील डॉ. आंबेडकर सांस्कृतिक सभागृहात पार पडला. सरन्यायाधीश न्या. भूषण गवई यांचे दीक्षाभूमीशी अतुट असे नातं आहे. त्यामुळे ते या कार्यक्रमात केवळ एक पाहुणे म्हणून सहभागी झाले नव्हते. तसे त्यांनी आपल्या भाषणातही



सांगतिले. यावेळी सरन्यायाधीशांनी अनेक जुन्या घटनांना उजाळा दिला. यातीलच एक घटना म्हणजे भीमराया घे तुझ्या या लेकरांची वंदना या अजरामर गीताच्या निर्मीतीची होय. सरन्यायाधीश म्हणाले मी तेव्हा बी.कॉम.ला शिकत होतो. दीक्षाभूमीच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त माझे वडील रा.सू. गवई यांनी कविवर्य सुरेश भट यांना एक भीम वंदना लिहिण्याची विनंती केली. यासाठी सुरेश भट हे त्यांच्या मुंबईतील शासकीय निवासस्थानी महिनाभर थांबले होते. या महिनाभरात त्यांची सेवा करण्याची जबाबदारी माझ्यावर होती. या महिनाभरात सुरेश भट यांनी जे गीत तयार केले ते अजरामर झाले. ते गीत होते. भीमराया घे तुझ्या या लेकरांची वंदना.. आज घे ओथंबलेल्या अंकुरांची वंदना.. या अजरामर गीताच्या निर्मितीचा मी साक्षीदार होऊ शकलो,असे सांगत त्यांनी संपूर्ण गीत सादर केले. यावेळी गीत गाताना त्यांचा कंठ सुद्धा दाटून आला होता. त्यांचे डोळेही पाणावले होते. यावेळी सभागृहात अनेक न्यायाधीश, वकील, वरिष्ठ अधिकारी यांच्यासह विविध क्षेत्रातील म्नायवर उपस्थित होते. संपूर्ण सभागृह स्तब्ध झाले होते. सरन्यायाधीश न्या. गवई यांनी या अजरामर गीतांच्या निर्मीतीची सांगितलेली कहानी आणि गायलेले गीत दीक्षाभूमीच्या इतिहासात एक खास भावनिक पान ठरले.